पवनाकांठचा

धों
डी

तीन अंकी नाटक

गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर

महाराष्ट्र प्रकाशन
अमरावती

मूल्य अडीच रुपये

पहिली आवृत्ति
ऑगस्ट १९६०, भाद्रपद १८८२

मुद्रक : बा. ग. ढवळे
कर्नाटक मुद्रणालय
कर्नाटक हाउस, चिराबाजार, मुंबई २

प्रकाशक : प्र. दि. बेदरकर
महाराष्ट्र प्रकाशन
राजकमल चौक, अमरावती

थोडेंसें

नाटकाविषयीं ....

'पवनाकांठचा धोंडी' या माझ्या कादंबरीचा तसें पाहिलें, तर या नाटकाशीं संबंध नाहीं.

कधींकाळीं कलाकाराला ज्या कथावस्तूचें दर्शन कादंबरीरूपानें घडलें, त्याच वस्तूचें चिंतन करीत असतां ती नाट्यरूपानें समोर उभी ठाकणें अगदीं सहज शक्य आहे. कादंबरी आणि नाटक, या दोन्ही वस्तूंचे बांधे अगदीं वेगळाले आहेत, त्यांचा परस्परांशीं संबंध नाहीं.

सदरहू नाटकाच्या बाबतींत असाच कांहींसा प्रकार घडला आहे. तेव्हां हें एक स्वतंत्र नाटक आहे, असें म्हणायला प्रत्यवाय नाहीं.

गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर

तळेगांव दाभाडे, पुणें

सदर नाटकाचा प्रथम प्रयोग प्रोग्रेसिव्ह ड्रॅमॅटिक असोसिएशन या संस्थेच्या विद्यमानें पुणें येथें भानुविलास नाट्यगृहांत दि. ३०-८-६० या रोजीं झाला.

लेखक गोपाल नीलकण्ठ दाण्डेकर **दिग्दर्शक** प्रा. भालबा केळकर

पात्र-परिचय

सारजा	सौ. विनया काळे	**सोनबा**	मधुकर टिल्लू
सरू	सुधा दीक्षित	**नेन्या**	दत्ता कळसकर
गोजी	भारती मराठे	**गनशा**	चन्द्रकान्त रणभोर
धोंडी	जयन्त धर्माधिकारी	**किसन्या**	सुरेश गुमास्ते
कोंडी	श्रीराम खरे	**जनार्दन गोपाळे**	बाळ फाटक
जोशी	वासुदेव पाळंदे	**किशा**	केशव घुले
भिम्या	रत्नाकर पुराणिक	**डॉक्टर**	श्रीनिवास देशपांडे
केरबा	श्रीधर राजगुरु	**इतर पात्रें**	अनिल जोगळेकर, अरुण जोगळेकर, भालबा केळकर, साने, मेहेंदळे, शरद किराणे इत्यादि

संगीत	बाळ माटे	**नेपथ्य**	श्रीधर राजगुरु
रंगभूषा	निवृत्ति दळवी	**प्रकाश-ध्वनि**	यशवन्त पेठकर, काऊर

अंक पहिला

प्रवेश पहिला

[पडदा वर जातांच धोंडीचें मराठमोळें घर दिसतें. दारासमोर दोन पायऱ्या आहेत. उजव्या बाजूला उभी ओसरी आहे. खानदानी वळणाच्या दारासमोर पडवी आहे. डाव्या हाताला कांहीं अंतरावर एक ओटा असून त्यावर ' वीर ' हवालदार घराण्याच्या पूर्वजाची समाधि आहे. मागील बाजूस लांबवर एक विहीर दिसत आहे. वीराच्या पलीकडे कक्षेमध्यें असलेल्या गोठ्याचें छप्पर दिसत आहे. डाव्या हाताला अगदीं समोर तीन चार ओबडधोबड धोंडे आहेत. दाराच्या समोर एक खाट आहे.

पडदा वर जातो त्याक्षणीं लांबवर मागें कुस्तीच्या हंगाम्याचा कोलाहल चालू असतो. डफडें जोरजोरानें वाजत असतें. उजव्या बाजूच्या कक्षे-मधून सुमारें पंधरा वर्षांची गोजी अतिशय घाईनें धांवत येते आणि दाराजवळ जाऊन हांका मारूं लागते.]

गोजी : सारजाकाकी, अव सरजाकाकी ! (आंतून सारजेचे शब्द ऐकूं येतात— " अग पर हो गोज्ये ! ") अव सरजाकाकी !

[अदमासें पन्नास वर्षे वयाची घरंदाज घराण्यांतील लक्ष्मी सारजा बाहेर येते.].

सारजा : काय झालं ग गोज्ये ?

गोजी : अव, किशाला पालथा घातलाय् कोंडीनानानं अन् सवारी भरून त्यो बसला हाय त्याच्या पाठीवर !

सारजा : व्हय् ? तुला कसं ठावं झालं ?

गोजी : अव, मंडळीचा लई कालवा चालल्याय्. ऐका ना !

सारजा : काय म्हनित्यात् त्यें ?

गोजी : म्हनित्यात्, कीं या कुस्तींत कोंडीनाना किशाला खानार !

सारजा : तुला कुनी सांगितलं ?

गोजी : मपल्या धाकल्या भावानं – धांवत येऊन मला सांगितलन् —

सारजा : काय सांगितलन् ?

गोजी : त्यो म्हनित होता, कां सलामी झाल्याबराबर, कोंडीनानानं किशाला खालीं घेतला.

सारजा : *(कौतुकानें)* बये माझ्या ! आनि काय म्हनाला तुपला भाऊ ?

गोजी : त्यो म्हनीत हुता, का किशाचा वा त्वांड हातानं झांकून रडतोय् !

सारजा : व्हय् ? आनिक ?

गोजी : आनिक – आनिक – अं – मी म्होरं विचारलं तर त्यो पुन्ना पळत ग्येला फडाकडं – अग बया ! सारजाकाकी, मी पन जात्ये.

सारजा : अग गोज्ये, तूं नग जाऊंस !

गोजी : का व ?

सारजा : अग, गागत्याल त्ये !

गोजी : *(क्षणभर थांबून)* सारजाकाकी, पेढे दिलं पाहिजेत बरं कां !

सारजा : *(गहिवर गिळून)* बाऽये, पेढे त दीनच अन् वाघोबाला सवा शेर गुळाची शेरणी वाटीन ! तुला ठावं न्हाई गोज्ये, आताबाई गेल्या, अन् त्यांनीं जातांना, ह्ये एव्हढंसं ल्येकरूं मपल्या वट्यांत घातलं !

गोजी : म्हनजे कोंडीनाना ?

सारजा : व्हय्! काय पर समजत न्हवतं. आय गेली त्याची, समदीं मानसं मुसु-मुसु रडत्यात. आन् ह्ये टुकुटुकु मपल्या तोंडाकडे पघतंय्. मंग म्या उचेललं. पोटाशीं धरलं आन् घरांत न्हेऊन पदराखालीं घेतलं.

गोजी : तुमचं ल्येकरूं ग्येलं तवा कोंडीनाना लय् रडला जनू ?

सारजा : *(आंसवें पुशीत)* बाये, ल्येकरूं त ग्येलं माझं, पर भावजीला समजिवतां समजिवतां नाकीं दम आला.

गोजी : म्हंजे ?

सारजा : त्येनं ल्येकराला घट धरून ठिवलं. सोडीना, याना माराया धावला.

गोजी : दादाला ? अग बया ! मंग ?

सारजा : मंग मोठ्या कष्टांनीं म्यां त्येच्या ल्येकरूं हातून सोडिवलं, आन् माती-आड कराया त्यांच्या हाती धिलं. बाये, या पोरापायीं जीव जळतो माजा रातदिस. घरधनी गागत्यात का, म्या पोराचा नासाडा क्येला. न्हय, मी म्हनीत्ये, हाय माजं लेकरूं वाईच हट्ट करनारं, पर आतां हवालदाराच्या धाकट्या भावानं हाट करूं न्हाई, तर कुनी करावा ?

गोजी : पघा की. बरुबरच हाय !

सारजा : *(जरा हळु स्वरांत)* हाय ना ? बाये, तुला म्हून सांगत्ये. किशा न्हाण्यासंगट भावजींनीं कुस्ती धरली की, आन् मंग दुध प्यायला येक म्हस आना म्हटलं.

गोजी : मंग ?

सारजा : मंग काय बाये ? त वाटीएवढाले डोळे काहाडले यांनीं माज्यावर. लय मनधरनी केली, तवा कुटं म्हादेव परसन्न झाला.

गोजी : *(हंसत)* काकी, धोंडीदादाला म्हादेव म्हंगाल्यात, मंग तुम्ही पार्बती झाल्या कीं !

सारजा : न्हाई ग बया ! मी त्यांच्या घरांतली केरसुनी ! मला कशाला पारबतीची पदवी *(मागें कोलाहल ऐकूं येऊं लागतो)* अग बया ! झाली जनु कुस्ती ?

गोजी : *(कानोसा घेत)* व्हय् ! झाली जनू ! सारजाकाकी, मी पघून येऊं का ?

अंक ❋ पहिला

सारजा : ऐ गोज्ये ! जाऊं नगस !

गोजी : असं का व काकी ?

सारजा : नग बाये ! तुपल्यावानी स्येन्या सुरत्या पोरीला फडाकड पघितलं, तर तुज्यावर डोळऽ काढत्याल !

गोजी : थोरलं हवालदार ?

सारजा : दुसरं कोन ?

गोजी : मी त्येन्‌ला दिसायचीच न्हाई !

सारजा : बाये माझ्या ! त्येन्‌ला काई सांगावं लागत न्हाई ! अवघं उमागतं ! बाये, स्येन्‌ला अवघं उमागतं !

[घामाघूम झालेला जोशी डाव्या कक्षेंतून येतो.]

जोशी : कुणाला अवघं उमगतं वहिनी ?

सारजा : ये बया ! जोशीबावा ! तुमी कुटं ग्येलतां ? कुस्तीकडे न्हाई ग्येला जनू ?

जोशी : नाहीं, त्याचं असं झालं, सकाळीं वाघोबाचा अभिषेक उरकला. मग जी सायकल सोडली, ती लोणावळ्याला.

सारजा : त्ये कशापाई ?

जोशी : तिथं जनू गोपाळ्याकडे सत्यनारायण होता. तो म्हणाला, तुमच्याशिवाय भागायचं नाहीं—

सारजा : जनू गोपाळ्या ? जनू गोपाळ्या कंचा ?

जोशी : अहो तो शिरगांवचा. त्याची मुलगी फायनल झाली, म्हणून सत्यनारायण बोलला होता तो–

गोजी : ये बया ! जोशीबावा, पोरीबी कायबाय व्हायला लागल्या जनू ?

जोशी : मग काय तुझ्यासारख्या गौरीच राहिल्या आहेत ?

गोजी : ह्ये काईतरीच बरं का जोशीबावा !

जोशी : नाहीं तर काय ! एवढी मोठी वाढलीस गोज्ये, तुला अजून पांडव किती म्हणून विचारलं, तर सांगतां येत नाहीं !

गोजी : न सांगाया का झालं ? सांगत्यें कीं–

जोशी : काय सांगणार ! तोंडानं म्हणशील बाजेच्या खुराइतके तीन, बोटानं दाखव-शील दोन, अन् डोळा मिचकावशील एक–

गोजी : *(तोंड पदरानें झांकून हंसत)* जोशीबावा कायतरीच बोलत्यात !

जोशी : कांहींतरीच ? आतां हें बघ–[मागचा गोंधळ आणि डफड्याचा आवाज वाढतो] अरे ! झाली कीं काय कुस्ती ?

गोजी : खालं किशा न्हाव्याला कोंडीनानानं ! *(तिकडे पळते.)*

सारजा : *(काकुळतीनें)* अग ये गोज्ये ! आईक ! ग्येलीच ! जोशीबावा, तुमीं तरी तिकडे जायाचं हुतं !

जोशी : मी ? मी जाऊन काय करूं ? नुसता कुस्ती बघत बसूं ?

सारजा : जोशीबावा—

जोशी : *(ओट्यावर बसत)*त्याचं असं आहे वहिनी, मी आपला एक साधा भट-भिक्षुक. सत्यनारायणाच्या कथा सांगाव्यात, एकादष्ण्या अभिषेक करावेत, लग्नमुंजी लावाव्यात. झालं, संपलं आमचं शहाणपण ! थोरले हवालदार फार उंच जागीं बसले आहेत. ते अजून सत्ययुगांतून खालीं उतरलेच नाहींत.

सारजा : आसं कसं जोशीबावा !

जोशी : माहीत आहे तुम्हाला ? आज सकाळीं मला हवालदार काय म्हणाले ?

सारजा : काय म्हंगाले ?

जोशी : थोडं पाणी आणा प्यायला, मग सांगतों– *(सारजा आंत जाऊन पाण्याचा स्वच्छ घासलेला गडवा घेऊन येते. जोशी पाण्याचे घोट घेत बोलतो)* सकाळीं मी हवालदारांना म्हणालों, हवालदार, तुम्ही कुणातरी एकाला आवरा ! असं गांवांतल्या गांवांत इरेला पेटणं बरं नव्हे ! कोंडी धाकटा भाऊ–त्याला आवरणं तुमच्या मनाला येत नसलं, तर—

सारजा : तसं का व ? यानीं नुसतं डोळं काहाडलं, तर पोर माजा थराथरा कापतोय् अजुनी !

जोशी : अहो, पण आपली एक गोष्ट सांगितली ! तर म्हटलं, कीं तुम्ही किशा न्हाव्याला तरी आवरा ! त्याला सांगा, कीं आजचा दिवस जा कुठंही. पुण्याला जा, मुंबईला जा ! एवढा उत्सव होऊन जाऊं दे, मग ये परत !

सारजा : मंग काय म्हंगाले ?

जोशी : कठीण आहे वहिनी, हवालदारांशीं बोलणं मोठं कठीण आहे ! मला म्हणायला लागले, ही पुन्यामुंबईकडली विद्या मला शिकवूं नका जोशीबावा ! कोंडीही माझा, अन् किशाही माझाच ! दोघांनीं हातावर हात दिला, आतां मी त्यांचे पाय ओढणार नाहीं !

[गोजी धांवत येते]

गोजी : काकी, अव काकी !

सारजा : काय झालं ग गोज्ये ?

गोजी : कोंडीनाना येतोय् – त्वांड झाकून – खाली जनूं त्यानं कुस्ती !

सारजा : *(उसासा सोडून)* आर देवा ! [ती ओटीवर धपकन् बसते, तों उजव्या कक्षेतून संतापलेला कोंडी येतो. तो सारजेजवळ जाऊन तोंड खालीं घालून बसतो] – भावजी !

कोंडी : व्हयन्ये ! *(तोंड लपवतो.)*

सारजा : आसं काय करावं बरं भावजी ! *(कोंडी बोलत नाहीं)* आइका कीं माजं !

जोशी : कोंडिबा ! अरे कोंडिबा ! इकडे माझ्याकडे बघ बरं ! अरे इतकं काय लावून घ्यायचं ? कुस्ती म्हणजे दोन पायांच्या भिंतीचा खेळ. कुणीतरी एकजण पडायचाच !

सारजा : पघा कीं –

जोशी : अरे, मोठे मोठे गामागुंगाही कधीं तरी कुस्तींत पडले होतेच कीं !

कोंडी : त्ये मलाबी ठावं हाये !

जोशी : आहे ना ? झालं तर मग—

कोंडी : पर—

जोशी : आतां काय पर ?

कोंडी : पर त्येंचा थोरला भाऊ त्येन्‌ला चित करनाऱ्याला डोक्यावर उचलून घ्यायला धावला नसल !

सारजा : ये बया ! यांनीं किशाला उचेलला जनू ? जोशीबावा, हाये का आतां ?

जोशी : आपल्याला कांहीं कळत नाहीं—

कोंडी : आन् त्येबी समर्थांच्या देखत ? तितल्या तिनं ? मी मातींत त्वांड खुपसून पडलेला, अन् दादा त्याला खांद्यावर उचलून नाचतोय्—

जोशी : चुकलं ! चुकलं ! हें पारच चुकलं !

[तोंच उजव्या कक्षेंत धोंडीचा गंभीर आवाज ऐकूं येतो. " लक्ष्या ! तुजं काय काम हाये वाड्यांत ? त्यांच कुस्ती मारलीस जनू ? जा घरों ! मी धाडतों तुझ्या ल्येकाला-जेवायला घालून ! " मागोमाग धोंडी किशाला हातीं धरून घेऊन येतो. धोंडीचा आवाज ऐकतांच कोंडी ताडकन् उठून घरांत जातो. सारजाही आंत जाऊं लागते.]

धोंडी : आइकलं का ?

सारजा : *(दारांत थबकून)* जी !

धोंडी : काय गोडधोड हाये का न्हाई सनासुदीचं ? किशाला ज्यावायला वाढा. त्यो कुस्ती ख्येळून दमलाय् ! *(त्याच्या पाठीवर थाप मारून)* शाब्बास ! हे र वाघरा ! खूप कुस्ती केली त्वा !

किशा : दादा, नग मला ज्यावाया !

धोंडी : का र ?

किशा : *(मान खालीं घालून हलवीत)* न्हाई मला ज्यावावसं वाटत !

धोंडी : *(मायेनें भरलेल्या स्वरांत)* किशा, रागावलास व्हय र हवालदारावर ?

किशा : *(एकदम धोंडीच्या पायांना हात लावून)* दादा, तसलं काई करीन त मला नरकांत पडावं लागल ! थोरल्या हवालदारावर कुनी रागावत नसतं !

धोंडी : न्हाई ना ? मंग झालं तर ! आइकलं का ? किशाला पाय धुवाया पानी द्या !

किशा : दादा, नगा मला आग्रो करू ! माझं मन इचवावानी डंख मारतंय् मला !

धोंडी : त्ये र कशापायीं ?

किशा : म्या कोंडीदाला चीत क्येलं—

धोंडी : *(आश्चर्यानें)* मंग ? ग्यानाच हायेस कीं ! आर, चीत क्येलं म्हणून का झालं ! आं ? जोशीबावा, आता तुमी सांगा या खुळ्याला ! कुस्ती कराया उभा ठाकल्यावर कुनीतरी येक जन पडनारच !

जोशी : त्याचं असं आहे हवालदार, आपल्याला त्यांतलं कांहीं कळत नाहीं —

धोंडी : घ्या! अव, तुमीच असं म्हंगाल्यावर मंग आभाळांत चंद्रसुर्व्या न्हायलंच न्हाई म्हना कीं—

जोशी : अहो, ते होते तिथंच आहेत. त्यांच्या उगवण्यामावळण्याचा हिशेब लावतां येतो, पण तुमचं वागणं कोड्यासारखं असतं!

धोंडी : घ्या!

जोशी : घ्या कसलं, अन् द्या कसलं–

किशा : दादा, चलतों मी–

धोंडी : आर तू आईकत नाहींस म्हन कीं!

किशा : आज माफी द्या दादा! उंद्या मी सवता हून ज्यावाया यीन! *(जातो)*

धोंडी : *(उसासा सोडून)* तूच तरी कसा आइकशील? माजं कुनीच आईकना झालंय्–माजं कुनालाच कळऽनां झालंय्!

जोशी : असं काय म्हणतांय् हवालदार!

धोंडी : मंग कसं म्हनू? कोन आइकतंय् माजं!

जोशी : कोण आइकत नाहीं तें सांगा बघूं?

धोंडी : सांगूं? आइका. तर–मोजा बोटं! गडावरची समदी कामगार मंडळी हितं खालीं राहायला आली–तोपची, शिकलगार, पोतदार, खासनीस–कारखानीस–झाडून समदी! पर गड सुटला, आन् कुनाचा पाय काई गांवांत ठर ना झाला! तरी बरं, का समद्यांना इनामं हैती धिलेलीं–सवता नाना फडणिसानं! पर तेवढ्यावर भागऽना झालं म्हन ऽ! ज्यो उटला, त्यो भाएर पळतोय्! मी म्हंगालों, आर नका जाऊं भाएर! जे धिलंय् राजानं, त्येच कष्ट करून पिकवा! पोटाला पुरंसं हुईल तुमच्या! आन् तुमी ग्येला हितून, तर समदा पवनपट्टा वसाड हुईल! पवनामायच्या खोऱ्यांत कुनी कारागीर सापडायचा न्हाई! आसं करूं नका! पर आइकलं का कुनी माजं? ग्येलं ऽ का न्हाई घरं घुबडांना न्हायाला ठेऊन?

जोशी : पोट आहे ना हवालदार?

धोंडी : *(उसळून)* पोट? आर गाडवांनो! काटऽका भरत न्हाई पोटांत? आं? आमाला न्हाई का पोट? आता ह्ये मर्द मराठे गडी–यांच्या बापद्यांनीं तरवार मारली राजाच्या पदरीं–आन् त्यांचीं पोरं काय करत्यात? खांद्यावर दुदाच्या कावडी

घिऊन दूद इकीत हिंडऽयात! आर आर आर! आर गोरसाचा इकरा क्येलता का कुनीं म्हराठ्यानं? आ?

जोशी : अहो सगळं जग विकतंय् दूध तूप —

धोंडी : इका की! मात्तर येक करा! आमच्यावानी येडे असत्याल त्यांना गोळ्या घालून मारून टाका!

जोशी : कांहीं तरीच!

धोंडी : *(उसळून)* काय चुकलं माजं? सांगा कीं!

जोशी : हें आतांचं वागणं पार चुकलं!

धोंडी : सांगा कीं!

जोशी : कोंडी चीत झाल्यावर किशाला उचलून खांद्यावर घेतलंत —

धोंडी : *(चकित होऊन)* जोशीबावा, तुमीबी?

जोशी : कां? कांहीं जगावेगळं बोललों मीं?

धोंडी : जगाला काईबी उमगत न्हाई!

जोशी : असं म्हणून कसं भागेल हवालदार? सगळ्यांनाच असं मूर्खांत काढून —

धोंडी : *(उसळून)* पर ह्ये माजं वागनं हवालदारांच्या. आजपत्तुरच्या बान्याला सोबलं का न्हाई त्ये सांगा पघूं!

जोशी : हवालदारांचा बाणा म्हणजे काय, तें तरी उलगडून सांगून ठेवा एकदां!

धोंडी : अस काय येड्यावानी करताय् जोशीबावा? मी बी काई जगायेगळा न्हाई! मीबी मानुसच हाय, किशानं चीत केलं सवता माज्या धाकल्या भावाला-माज्या ल्येकराला! खिनभर माज्याबी हिरद्याला चटका बसला!

जोशी : अन् मग कां तो जगावेगळेपणा केलात? नसत्या कल्पनांचीं घरकुलं मांडीत बसायचीं, अन् मग त्यांच्या राखणापायीं जीव तळहातावर धरायचा!

धोंडी : *(गर्वानें)* जोशीबावा, चटका बसला, त्यो धोंडी ढमाल्याच्या हिरद्याला! पर लगोलग किल्ल्याकडे नंदर ग्येली. थितं दिसला — कोन दिसला आसल?

जोशी : कोण?

धोंडी : सवता शिवाजीराजानं ज्या ढमाल्याच्या कमरेला तरवार बांदून किल्लेदारी त्याच्याकडे सोपिवली, त्यो ढमाला! मुठीवानी मिशा! परातीएवढी छाती! गुंजावानी

लाल भडक नंदर ! माज्यावर डोळे काढून त्यो माजा बापदादा म्हंगाला, मर्दा, तू या पवनपट्टयाचा हवालदार ! तुजं घरानं थोरामोठ्याचं ! आर हीं दोनी ल्येकरं तुजीच ! कुनी का कुस्ती मारीना, तुज्याच ल्येकरानं मारली ! चाल उचेल ! न्हाई उचेललंस, त ग्येली तुजी हवालदारी मातींत ! बुडिवलस तू मपल्या घरान्याचं नांव ! उचेल, न्हाई तर थू तुज्या जिनगानीवर !

जोशी : भले हवालदार – मग ?

धोंडी : मंग काई न्हाई ! आसुडाचा फटका खाल्ल्यावानी झालं ! जसा सगळ्या अंगांतून जाळ धावला. तसाच फडांत शिरलों, आन् उचेललं किशाला ! आता उमागलं ?

जोशी : *(श्वास सोडून)* हवालदार, तुमच्या पायांपाशींही बसायची लायकी नाहीं आमची ! तुम्ही सत्ययुगांतलीं माणसं. कशाला आलांत आमच्या कलियुगांत ? जें तुम्ही वागाल, तें जगावेगळं असलं, तरी निख्खळ सोनं असेल —

धोंडी : *(पटकन् खालीं वाकून)* आशिरवाद द्या जोशीबावा !

जोशी : बामण आहें मी. कुणी पाया पडलं, कीं दिला पाहिजे तो – काय देऊं ?

धोंडी : आसं म्हना, का वाडवडिलांच्या नावाला कलंक लागलं, आसं उभ्या जल्मांत काय पर घडायचं न्हाई मपल्या हातून !

जोशी : दिला आशीर्वाद ! नाहीं घडायचं तुमच्या हातून वेडं वाकडं ! [तोंच सारजा दारांतून येऊन जोशाला नमस्कार करते] अरे ! वहिनी, मांडलं आहे काय तुम्हीं आज ?

सारजा : जोशीबावा, यान्‌ला आशिरवाद धिला–मला न्हाई धिला ?

जोशी : देतों बाबा देतों ! काय देऊं ?

सारजा : असा द्या—

जोशी : कसा ?

सारजा : असा द्या, का जल्मोजल्मीं यांच्या दारची दिवली व्हावं, आन् यांच्या पायाची चाकरी करीत जनम् संपावा !

जोशी : तथास्तु ! दिला – [सारजा इकडे तिकडे करते, अन् मग पटकन् धोंडीच्या पायां पडून घरांत पळते.]

धोंडी : आर इच्या मारी ! जोशीबावा, हाय का आता ह्यो येडेपना !

जोशी : हवालदार, अशीं दहावीस वेडीं जोडपीं जन्माला आलीं, तर जग उद्धरून जाईल ! बराय्—चला वाघोबाच्या आरतीला !

धोंडी : चला की – पर आइकलं का ? परसाद पोहोच्विवला का तिकडं ?

सारजा : *(दारांतून)* पोंचवली – लवकर घरीं यायचं बरं का जेवाया !

धोंडी : बरं बरं ! रावसाब कुठं ग्येलऽ ?

सारजा : हायेत —

धोंडी : पर कुटं हायेत ? फडातून जो नीट घराकडे धांवला ! मी म्हन्तोय आर थांब ! पर काई आइकलं न्हाई !

जोशी : अहो तुमच्या बरोबर किशा होता ना ?

धोंडी : *(उसळून)* मग काय झालं ? *(उसासून)* त्ये काई न्हाई जोशीबावा ! अलिकडऽ मंडळी माजं ऐकऽना झाली !

जोशी : सगळे ऐकतात तुमचं ! चला आतां !

धोंडी : *(निघतांना)* त्याला माज्यासंगट ज्यावायला वाहाडा ! न्हाई तर उपाशी न्हाईल !

सारजा : मी त्यांना येकल्याला वाढीन. तुमासंग नीट जेवायचे न्हाईत त्ये.

धोंडी : काय बरं दिसल तसलं करा ! *(जातात.)*

सारजा : भावजी ! अव भावजी ! *(हांका मारीत आंत जाते. आंतून दूध काढायला चरवी घेऊन बाहेर येते.)* दुद काढून घ्या म्हनत्येना ! उगीच उशीर नका करू ! [*कोंडी आंतून बाहेर येतो.*]

कोंडी : न्हाई काढायचा दुद !

सारजा : आसं काय करावं येड्यावानी भावजी !

कोंडी : मी येड्यावानीच करनार !

सारजा : ये बया !

कोंडी : ये बया न्हाई अन् जा बया न्हाई ! व्हयन्ये, आतां मी जोग घेऊन जानार !

सारजा : जोग घेऊन जानार ? कुटं ?

कोंडी : कुटं ? कुटंबी ! आळंदी—पंढरी—काशी—बनारशी—

सारजा : बये माज्या ! आन् थिर्त ज्यावाया व कोन घालील ?

कोंडी : का ? तू न्हाई का घालायचीस ?

सारजा : हाय का आतां ? मी कशी यीन हो तुमासंगट ?

कोंडी : तुला बी आलं पायजे !

सारजा : म्हंजी तुमी बुवा म्हाराज बनून म्होरं चालनार—अन् सैपाकाचं सामान, गूळखोबऱ्याचा झोळना, म्हस, तिची वैरन, ह्ये सगळं डोक्शावर वागवीत मी तुमच्या मार्ग—

कोंडी : तू कशाला घेतीस ह्ये सगळं ? आपला किसना घील की !

सारजा : म्हंजी किसना बी संगट याया हवा !

कोंडी : व्हय् ! समदे याया हवेत—येकल्या दादाला वगळून समदे ! दादा नग आम्हांसंगट !

सारजा : *(हंसूं लपवीत)* भावजी, मंग असं करूं !

कोंडी : काय ?

सारजा : आपल्या ह्या तुंगी गावाचंच नाव बदलून काशी-बनारशी ठेऊं—म्हंजी कुटं जायाबी नग, अन् यायाबी नग !

कोंडी : तू च्याष्ट्या करतीस व्हयन्ये !

सारजा : ये बया ! बुवा म्हाराजांची कशी च्याष्टा करीन व मी ?

कोंडी : व्हय ! च्याष्टाच करतीस ! जा ! मी तुज्यासंगट बी बोलनार न्हाई !

[पागोटें काढून तें खांबाला लावतो, अन् त्यावर डोकें ठेवून लवंडतो.]

सारजा : नका बोलूं ! मला मस कामं पल्डींत आजून ! दुद काडायचंय्, वाघोबाच्या रावळांत दिवा ठ्यावायचाय्—

कोंडी : व्हयन्ये, ईख कसं असतं ग ?

सारजा : ईख ?

कोंडी : व्हय ! म्हंजी मरन्यासाठीं खात्यात त्ये !

सारजा : कुनाला मरायचंय् ?

प्रवेश ❋ पहिला

कोंडी : मला! आता मी खिनभर सुद्दा जगनार न्हाई! दादानं माजा अपमान क्येला!

सारजा : ठरलं का पक्कं!

कोंडी : अगदीं—जाम ठरलं!

सारजा : हां! मंग त्याला ईख पायजेच. पर कुठून आनायचं त्ये ईख?

कोंडी : बाजारांत न्हाई भ्येटायचं का? तू सवता जा, आन् आपल्या गनशावाऱ्याला सांग, आमच्या कोंड्याला जीव द्यायचाय्, त ईख द्या म्हनाव्!

सारजा : बरं! कंच ईख आनू? आफू का मोरचूद?

कोंडी : आफू चांगली लागती का? जिलबीवानी?

सारजा : न्हाई—कडू लागती!

कोंडी : अरारारारा! मंग अफू नगस—आपलं कंचं त्ये—मोरचूत—हां, त्ये आन! नावबी पख असलेल्या मोराचं हाये!

सारजा : किती आनू?

कोंडी : इक्तं कळना व्हय् तुला! येवढी म्हातारी झालीस? आन् की बचाकभर!

सारजा : मंग तुमीच जाऊन आना की!

कोंडी : मी? न्हाई! मी आता झकास झोप काढनार!

सारजा : आहाहाहा! तोंड बघा ईख खानाऱ्याचं! म्हन आफू न्हाई त मोरचूद आन! मोरचूद खायचा म्हंजी काई रेवड्या खायच्या न्हाईत!

कोंडी : व्हयन्ये!

सारजा : चला! दुद काढून तुम्हाला ज्यावायला वाढायचं हाय मला—

कोंडी : तू लई वाइट बायकू हायेस! मी आज ज्येवनार न्हाई! दादानं किशाला ज्येवायला का आनलं? मी न्हाई ज्येवनार आज!

सारजा : ये बया! आन् उंद्या?

कोंडी : उंद्याबी न्हाई!

सारजा : परवा?

कोंडी : परवा—तेरवा कंदीच न्हाई! इतून उठायचाबी न्हाई! माजा गूळखोबऱ्याचा झोळना आनून द्ये म्हंजी झालं—

सारजा : बया गय ! लई वैराग आलंय् जनू ! बघू !

कोंडी : *(झोपल्या झोपल्याच तोंड पागोट्यांत लपवीत)* जा म्हन्तों ना !

सारजा : *(जणूं धोंडीची चाहूल लागल्यासारखें)* अग बया ! आलं जनू !

कोंडी : *(चपापून उठत)* आला का ?

सारजा : *(हंसत)* येक भाद्दर उटनार न्हवता वट्यावरून !

कोंडी : *(पुनः झोंपत)* तू लई वाईट्ट बायकू हायेस ! लई म्हंजी शंबर–हज्जार !

सारजा : आहाहाहा ! दिवऽववाळा दिवऽ !

[चरवी घेऊन घरामागें जाते. ती गेल्यावर कोंडी पुनः तोंड पागोट्यांत खुपसून पाल्था झोपतो. तोंच भिम्या दबकत येतो. तो अलगद साद घालतो.]

भिम्या : कोंडीना ! ओ धाकले हवालदार !

कोंडी : कोन ? भिम्या ! *(उठून बसत)* ये कीं र !

भिम्या : थोरले हवालदार न्हाईत जनू ?

कोंडी : न्हाई. त्यो ग्येला वाघोबाच्या रावळांत.

भिम्या : आन् व्हयनी ?

कोंडी : ती ग्येली दुद काडाया–

भिम्या : *(येऊन कोंडीजवळ बसत, पान काढीत)* आसं व्हयू ? घ्या ! पान घ्या ! पर हवालदार, ह्ये काई चांगलऽ झालऽन्हाई !

कोंडी : *(विषण्ण होऊन)* न्हाई !

भिम्या : *(उत्साह लाभून)* म्हंजी आता पघा कीं ! थोरल्या हवालदारांना इतकं कळऽना ! किशान्या येक मुस्काटांत देऊन त्याला काढून लावायचा फडांतून – मंग आमीं पघितलं आसतं कीं त्याच्याकडऽ ! पर त्ये काई सुसलं न्हाई हवालदाराला ! कसं ऽ !

कोंडी : न्हाई सुसलं !

भिम्या : आंगा आस्शी ! धावल हवालदार किशाकडे, आन् येखाद्या येड्या भैताडावानी –

कोंडी : *(डोळे फिरवून)* हां ! भिम्या, दादाला तसलं न्हाई बोलायचं !

भिम्या : बरं बाबा, न्हाई बोलत ! कुनाचं बरं करायची काई सोय न्हायली न्हाई आजकाल ! मला बी कुटं योळ हाय ! उगीच म्हनूलं, कोंडीनाचं ह्ये आसलं येडं-बागडं झालं, जाऊन इच्यारपूस करावी ! तर मलाच बसली तराटणी ! मला दुदं घेऊन लोनावळ्याला जायाचं हाय !

कोंडी : *(उत्साहानें उठून बसत)* भिम्या, आईक –

भिम्या : *(निघत)* मला जायाचं हाय ना –

कोंडी : त्येच त इचारितों तुला – तू रोज लोनावळ्याला जातो का ?

भिम्या : व्हय् –

कोंडी : रोज ?

भिम्या : व्हय् - लय मजा आसती. सांजच्या पारीं मानसं दुदं काढून ठेवीत्यात. आपुन कायबी करायचं न्हाई. निसती कावड उचेलली खांद्यावर, का डुलत डुलत मळवली. थितं सांजची लोकल गाठली, का लोनावळा !

कोंडी : उशीर झाला तर ?

भिम्या : काय होत न्हाई उशीर - हां कंदी झालाच धा ईस मिण्टं, त डायवर आपला दोस्त हाय ! कू ऽऽ अशा शिट्या वाजवीत उभा न्हातो. गाडींत बसलं, का पुनः कूकू, का जाऊन लोनावळ्याला थांबायची गाडी –

कोंडी : लोनावळ्याला रातीं दूद घ्या दूद म्हनून हिंडावं लागत आसल ?

भिम्या : अवो येड ऽ का काय ? आपला रतीब हाय ! थितं इङलशेट चिकीवाल्याच्या दुकानांत दुद घातलं, त्याच्या संगट दोन गोष्टी केल्या, पाव मिसळ हानली–

कोंडी : पाव ? कसा लागतो पाव ?

भिम्या : आरारारा ! ठावा न्हाई जनू पाव ? कंदी ग्येलाच न्हाई लोनावळ्याला, मंग कसा ठावा हुईल ? ह्यो आसला आसतो–मदाच्या पोळ्यावानी. लई झाक लागतो. त्यो हानला, का गपगार ! मंग डुलत डुलत गंमत पघत परत.

कोंडी : रातच्या पाहारीं कसली गंमत ?

भिम्या : वा राव ! अव रातींच तर लई गंमत आसती ! बाया रातींच फिराया निंगत्यात – बाप्यांचे हात धरून –

कोंडी : अगा आवौ –

भिम्या : अव सांगतों काय तुमाला ? गोऱ्या भक् बाया–वठांना काय फाशीत्यात. तोंडाला गव्हाची कनीक. गुडघ्यायवढाले फराक घालीत्यात–म्हंजी फारशिनी बरं का !

कोंडी : आर इच्च्या मारी-पर त्ये तुला कसं वळखूं येतं ?

भिम्या : घ्या ! म्हन मला कसं वळखूं येतं ! अव, तुमी आला का धा ईस येळा, त तुमालाबी वळखूं यील–ही फारशीन–हीबामनीन–ही आपली म्हराठ्याची–समदं कळतंयू !

कोंडी : मंग लई वाईट !

भिम्या : वाईट ? आत्तां मातुर काहार झाला ! अव, मानूस श्याना होतो लोनाव-ळ्याला जाऊन ! तुमी कुटं ग्येला न्हाई, आला न्हाई, कसं कळायचं तुमाला !

कोंडी : *(उसासा टाकून)* व्हय्-त्येबी खरं ! पर आमचा दादा हाये ना ! तो श्येती सोडून जाऊं देत न्हाई कुनीकडं !

भिम्या : आपुन बाबा बोलत न्हाई ! तुमाला पटकन् राग यायाचा –

कोंडी : आर बोलकी !

भिम्या : न्हाई बाबा ! माजा टाईम झाला – *(जाऊं लागतो.)*

कोंडी : *(त्याला धरून आणीत)* ए भिम्या, आर सांग कीं !

भिम्या : आता आग्र्योच करता, तर सांगतों ! अव श्येती का धंदा हाय ? ढोरावानी सालभर राबत बसावं–आभाळाकड ऽ डोळ लावून, तवा कुटं सालांतून येकदा दान्यांची रास नंदरेला पडायची !

कोंडी : खरं हाय गड्या तुजं !

भिम्या हाय ना ? अव दुदाचा धंदा पघा की ! गेल्या सालांत म्यां धा हज्जार रुपयांचा धंदा क्येला-येकल्यानं –

कोंडी : धा हज्जार ? नसरू –

भिम्या : अव पाच हज्जाराला त काई मरन न्हाई ! आपुन कायबी करायचं न्हाई ! निसतं हांतरुनावर लोळायचं. समदं घरचीं मानसं करीत्यात. आपुन निस्तं दुद घ्येऊन थिर्तं घालून यायाचं–दुद घालायचं, आन् ठनाठन रुपय ऽ मोजून घ्यायाच ऽ !

कोंडी : भिम्या, मी बी आलों तुज्या संगट तर ?

भिम्या : चला कीं राव ! तिक्तंच बरं वाटल तुमाला !

कोंडी : न्हाई–मी म्हनीतो म्यांबी दुदाचा धंदा क्येला तर ? आपल्याला काय ग्येती गोड लागेना झाली !

भिम्या : त्ये पघा बाबा ! तुमच ऽ दादा जगायेगळऽ हैती ! आमीच दुदं इकाया न्येतो, ते आमाला गागत्यात, का पोरांनो, तुमी म्हराठ्याचा धरम बुडवला ! म्हराटऽ आसून दुद इकीता ? *(जाऊं लागतो. तोंच सारजा दुधाची चरवी घेऊन येते.)*

सारजा : कोन ? भिम्या ?

भिम्या : व्हय काकी-उगा आपलं कोंडीनानाला इच्याराया आलतों.

सारजा : मंग बस कीं र ! वाइच भावजीसंगट दुद पिऊन जा !

भिम्या : *(हंसून)* न्हाई काकी ! मला काई दुद गोड लागत न्हाई !

सारजा : मंग काय निसतं दुद इकनं गोड लागतं ?

भिम्या : काकी, अव मारवाड्यांत पोरीबी इकीत्यात ! आन् तुमी घिऊन बसलाय गोरसाचं ! जेग लई फुडं चाललंय् काकी !

सारजा : जाऊं दे बाबा ! तुमी तिकडं काई का कराना ! ही तुमची इद्या आमाला शिकवूं नका म्हंजी झालं – *(भिम्या जातो. सारजा घरांतून पेला आणून तो आणि चरवी कोंडीसमोर ठेवते.)* हं घ्या जोगी महाराज ! दुद प्या, आन् घटका-भऱ्यानं ज्यावायला या !

कोंडी : *(पेला पलिकडे सारीत पाय पसरून आणि गाल फुगवून बसतो)* आमाला नग !

सारजा : भावजी, प्या मुकाट्यानं ! मला छळूं नका !

कोंडी : मी दुद पिनार न्हाई–ज्येवतनार न्हाई-कायबी करनार नाई !

सारजा : *(त्याच्याजवळ जात)* आर माज्या ल्येकरा, आसं करू न्हाई ! येका कुस्तींत डावं उजवं झालं, म्हणून कुनी आन्न त्यागीत न्हाई ! ऊट ऊट ! पिऊन घ्ये त्ये दुद !

कोंडी : करायचं काय दुद पिऊन ? का दादानं माझा अपमान क्येला ! मला जगनं ग्वाड वाटेना झालं ! न्हाई पिनार दुद ! ज्यावनार बी न्हाई !

सारजा : *(आश्चर्यानें त्याच्याकडे बघत)* भावजी, तुमाला झालं काय आज ?

कोंडी : मला झाला चाब्या रोग!

सारजा : *(त्याच्या पाठीवरून हात फिरवीत)* न्हाई माज्या ल्येकरा, ऊट! आसं करूं न्हाई! माजी आन हाय तुला! *(पेला उचलते.)*

कोंडी : तू लई वाइट्ट बायकू हायेस! जवातवा आनाशपथा घालतीस!

सारजा : आसूं द्या मी वाईट पर दुद पिऊन ज्यावाया चला!

कोंडी : येक हा म्हंशील, त उठन् ज्यावाया. न्हाई तर काई उटायचा न्हाई—परान ग्येला तरी –

सारजा : *(त्याच्या तोंडावर हात ठेवीत)* माज्या बाळाची बलाई ग्येली—बाळा, मांजच्या पारीं आसं बोलूं न्हाई!

कोंडी : मंग हाय का कबूल? हा म्हन!

सारजा : काय हा म्हनायचं?

कोंडी : त्ये मंग सांगल-आदुगर हा म्हन!

सारजा : तसंकसं हा म्हनूं?

कोंडी : मंग तुजा कोंडी म्येला—

सारजा : *(ओरडते)* भावजी!

कोंडी : हा म्हन!

सारजा : बरं, हा!

कोंडी : हां! आता दादाला सांगून मला म्हशी घेऊन ये!

सारजा : आता कशाला आनखी म्हशी? येइ हाये, तीच धंगाळभर दुद येती की!

कोंडी : व्हयन्ये, तुला काई पर समजत न्हाई! आग, लई म्हशी आसल्याबिगर कसा करायचा?

सारजा : आर पन काय?

कोंडी : धंदा!

सारजा : कसला?

कोंडी : इक्तं उमगत न्हाई? दुदाचा! मला सवतंतर दुदाचा धंदा करायचा! येगळा – पेशल!

सारजा : *(हातून पेला खालीं गळून पडत)* भावजी!

कोंडी : व्हय् ! मी दादाच्या श्येतींत ढोरावानी खपनार न्हाई ! माजा मी दुदाचा धंदा करनार ! दादा न्हाई म्हंगाला, तर येगळा हून करणार, इकतं ध्येनांत ठीव म्हंजी झालं ! *(तो निघून जातो.)*

. . . . प्र
वे
श
दु स रा . . . .

[भिम्या खांद्यावर कावड घेऊन येतो. थबकतो. मागें बघून साद घालतो.]

भिम्या : ओ नेन्या ! नेन्या हो ऽ !

नेन्या : *(पडद्यांतून)* आलो वले ! का वरडतो मोटारीच्या भोंग्यावानी !

भिम्या : चल चल ! मपल्या म्हशींसाठीं सरकीचा येक दानाबी न्हाई घरीं – चल !

नेन्या : *(खांद्यावर कावड घेऊन येतो)* आर व्हय म्हशीवाल्या ! लोकांच्या घरीं वो हाएत कीं म्हशी ! निस्ता पोर्टरला निरोप सांगाया ग्येलो, त तुला दम निघऽना ! *(पाहून)* भिम्या, तू येकलाच ?

भिम्या : न्हाई तर कोन भुत आसतं का रोज माज्या संगट !

नेन्या : हवालदाराला कुटं सोडलंस ?

भिम्या : त्यो तमाखू घेऊन येतोय् –

नेन्या : भिम्या, त्या क्येला गड्या हवालदाराला तयार !

भिम्या : कुनीं करावं लागत न्हाई – धंद्याला गडी लागला, का आपच तयारहुतोय् !

नेन्या : आर, पर उस्ताज पायजे का नको ? शिग्रेट वढाया शिकिवलंस का न्हाई ?

भिम्या : त्यो माज्या फुडं ग्येला ! मी दोन आन्यावालं पाकीट वढीतो चार मिनार ! कोंब्या काई कप्तान बिगर दुसऱ्या शिग्रेटीला हात लावीत न्हाई ! सहा आन्याचं पाकीट !

अंक ❋ पहिला

नेन्या : आतां आसल का त्याच्या खिशांत ?

भिम्या : आसल त कुटं जातंय् ?

नेन्या : मग बस गड्या बस ! येक येक झुरका मारू कप्तानचा !

भिम्या : आर पर –

नेन्या : बस ! *(हात धरून त्याला बसवतो)* बाकी हवालदार राजा मानूस हां !

भिम्या : अशी समदं पघनारी ऱ्हयनी आसली, त कुनीबी राजा हुईल ! मी न्हाई का हुनार ? निसता राजाच का परधाणबी हुईन की !

नेन्या : भिम्या; थोरला हवालदार बोलत न्हाई म्हनं कोंड्यासंगं ?

भिम्या : न्हाई !

नेन्या : का र ?

भिम्या : तुला ठावं न्हाई जनू ?

नेन्या : समदं काई ठावं न्हाई – पर सांग कीं ! सांगितलंस त काई बिघडल का ?

भिम्या : आर कोंड्या धंदा कराया लागला का दुदाचा—

नेन्या : का र भिम्या, थोरल्या हवालदारानं दुदाच्या धंद्यावर का र साप-मुंगसावानी डाव धरलाय् ?

भिम्या : म्हनं, वाडवडिलांनीं कुनीं क्येला न्हाई हा धंदा—

नेन्या : इन्वितारच हाये ह्यो हवालदार !

भिम्या : आता पघ म्हंजी झालं !

नेन्या : भिम्या, आर मला लई इचार पडलाय्, का जर ह्या थोरल्या हवालदाराची आन् दुदाच्या धंद्याची अशी दावेदारी, मंग येनं कोंड्याला म्हशी घ्येऊन धिल्या कशा ?

भिम्या : आर ह्यो कोंड्या धरनं धरून बसला. आन्नपरसादी घ्येपमंदी बंद ! पार कंपलेट बंद ! आता कोंड्या उपाशी ऱ्हायल्यावर सारजाव्हयनी ज्येवल का ?

नेन्या : न्हाई ज्यावायची ! तिचा लई जीव कोंड्यावर !

भिम्या : आंगा आश्शी ! मंग पडलं का कोडं हवालदाराला ! त्यांनबी आन्नपानी सोडून पघितलं. सताठ दीस निसता धिंगाना धिंगाना झाला. भाएर कुनाला काई उमागलं न्हाई म्हना !

प्रवेश ✻ दुसरा

नेन्या : न्हाई उमागलं !

भिम्या : आंगा आश्शी ! त या आठ रोजांत धोंडीकोंडीचं एकम्येकाला दरुशेन न्हाई. पर आठव्या दिशीं जव्हा का चिपाडावानी वाळल्याल्या कोंडीला पघितलं हवालदारानं, तवां मंग गडी ढ्येपाळला ! व्हयनीला म्हंगाला, का म्हशी आनीतों ! पर–

नेन्या : पर ? पर काय ?

भिम्या : पर या दुदाच्या पैक्यांतला योक फद्या काई घरांत खरसतां उपेगाचा न्हाई. *(कोंडीबा कावड घेऊन येतो)*

कोंडी : का र ? काय खरसतां उपेगाचा न्हाई ?

भिम्या : आर काई न्हाई – आपलं त्ये ह्ये – काय त्येचं नांव त्ये – पर तुला लई टाईम झाला र ?

कोंडी : आर वान्याकडं काई कसान मिळाली न्हाई. तवा मंग पिवळा हात्तीच आनली. चला कीं र ! बसलाय् कशापाई ?

भिम्या : या नेन्याला सय आली – पेन्याची –

नेन्या : भिम्या, टकुऱ्यांत धोंडा घालीन हां !

भिम्या : घे वाघोबाची शप्पत ! म्हन, का तू कसान वढायचं बोलला न्हाईस !

नेन्या : व्हय् गड्या कोंडीनाना ! आमी आपलं निसती खाकी वढनार ! कहाड तुजा कंचा हात्ती हाय त्यो – ढवळा का पिवळा ! दोन दोन झुरकं मारून मंग चलूं !

कोंडी : ए नेन्या ! दादानं इच्यारलं, तर त्याला शिग्रेटीचं सांगायचं न्हाई हां ! न्हाई त तू गांवांत दवंडी घालीत हिंडशील, का कोंब्या शिगरेट वढीतो – दादाला आमच्यावर गागाया तित्कंच कारान घडलं ! आधींच ह्यो फाल्गुनाचा म्हइना. त्यांत तू पेटवून देशील होळी !

[दोघांना दोन सिगारेटी देऊन एक आपण पेटवितो.]

नेन्या : आर तिगांना तीन कशापाई ? येकच वढली असती की तिगांनीं !

भिम्या : ये नेन्या ! आपल्या हवालदाराचं काम आसं शिकिण किलास न्हाई ! येकदम फष्ट किलास ! हां ! हवालदारावर वागोबा परसन्न हाये ! जितं जाईल तितं काम फत्ते !

कोंडी : तुज्या का पोटांत दुकाया लागलं ?

भिम्या : आमच्या पोटांत कशाला दुकंल ? आमाला तेलच्या गुळवनी खायाला भेटल्ह ! व्हय र नेन्या, पुरन पोळी खाल्ल्यानं तुज्या पोटांत दुकतं व्हय् ?

नेन्या : न्हाई न्हाई ! आपल्या पोटांत काई दुकत न्हाई ! आर पर कुनाच्या पुरन-पोळ्या खायाच्या ?

भिम्या : *(डोळे मिचकावून)* नेन्या, तू भित आंदळा गाडाव हायेस पक्का ! मानसं कुनीकडे जात्यात, काय करीत्यात, तुला कायबी दिसत न्हाई !

कोंडी : भिम्या, चपेटा खायाचा का येक ?

भिम्या : हाय का नेन्या, लागली का गोळी बरुब्बर ?

कोंडी : *(उसळून)* गोळी लागाया मी काय झाडावरलं पाखरूं हाये व्हय रे ? व्हय, जातों मी जनाप्पा गोपाळ्याकडे ! त्यो आमचा सोयरा हाये — मंग ? तुला काय म्हनायचं हाये फुडं ?

भिम्या : मला काई म्हनायचं न्हाई ! इकतंच म्हनायचं हाये, का पंचागन पघा, येकदा म्हूर्त ठरवून टाका !

नेन्या : आर इच्या मारी ! ही भानगड हाये व्हय ? एकदम चेष्ट काम हाये ! पोरगी दिसायला नंबरी हाये—

कोंडी : *(खवळून)* करूं का येका टकुऱ्याचीं दोन टकुरीं ?

भिम्या : आ रा रा रा ! लई खवळला जनूं हवालदार ? इकतं गरम व्हायाचं कारन न्हाई ! हुईल हुईल ! लवकरच लगीन हुईल ! मी जाऊन सांगतों व्हयनीला —
(दोघेही उठून चालूं लागतात.)

कोंडी : *(ओरडून)* भिम्या ! गठुळं बांधुन टकमक टोंकावरून लोटून दीन हां !
(त्यांच्या पाठोपाठ जातो.)

. . . . प्रवेश तिसरा . . . .

[सारजा दाराशीं मूग पाखडीत बसली आहे. मूग सांठवायचा रांजण शेजारी ठेवला आहे. विहीरीच्या बाजूनें कावड घेऊन कोंडी येतो. त्याच्या मागोमाग गोजी. दोघेही वादत येत आहेत.]

गोजी : कोंडीनाना, मला अशी चिडवूं नको बरं कां !

कोंडी : आपुन काई कुणाला चिडवित न्हाई. जेग म्हनतय त्ये आपुन म्हंनतो.

गोजी : मी व्हयनीला सांगन बरं का !

कोंडी : सांग कीं ! व्हयनी काय मला फांशी देत न्हाई.

गोजी : *(ओटयाजवळ येऊन)* हवालदारीन काकी, तुमी कोंडीनानाला काईतरी सांगा बरं का !

सारजा : *(हंसून)* अग गोज्ये, पर झालं काय? कां इकती भांडाय लागलांत दोगं ?

कोंडी : व्हयन्ये, तूंच सांग बगूं ! आतां गोजी एरंडावानी उच झाली आन् टमाटर-वाणी बंब फुगली —

गोजी : कोंडीनाना – तूं मपल्या दारावरून चालल्लास म्हंजी खरकटं पानी वतीन बरं का अंगावर !

कोंडी : वत कीं ! मी तुला काखंत धरून पवनाबाईंत नेऊन बुडवीन ! *(दोघेही एकमेकांना जीभ दाखवतात.)*

सारजा : भावजी, कां तिला छळीतां उगा ?

गोजी : काकी आतां बघा म्हंजी झालं !

कोंडी : *(कावड ओट्याजवळ ठेऊन ओटयावर बसत)* व्हयन्ये, तुला बी काय कळत न्हाई —

सारजा : व्हय ! माज केस उन्हानच पिकलं !

कोंडी : क्येस पिकलं म्हून काय झालं ? तूंच सांग बगूं, आत्तापावूर गोजीचं लगीन झालं असतं का न्हाई दाभाड्याशीं ?

गोजी : *(लटक्या रागानें)* हाय कां काकी ?

सारजा : भावजी, गांवच्या लेकींना असं चिडवूं न्हाई !

कोंडी : मंग काय परगांवच्या ल्येकींना चिडवावं ? आपुन तर गोजीला चिडवनारच ! टमाटरवानी बं फुगल्याल्या गोजीला बोंबलावानी सुकड दाभाड्या न्हवरा मिळनार !

गोजी : आन् मंग तुलाबी काळी ढुस बायकु मिळनार !

कोंडी : तुझ्या न्हवऱ्याच्या शेकाट्यावानी झोकांड्या जात्याल –

गोजी : तुझ्या बायकूचा रंग पघून भुतंबी भेत्याल !

कोंडी : तुजा न्हवरा तुला धरून बडवील !

गोजी : तुजी बायकू तुला धरून बोचकारील !

कोंडी : तुजा न्हवरा तुला रातदीस खुट्टयाला बांधून ठिवील –

गोजी : तुजी बायकू रातदीस तुज्याशीं कडाकडा भांडत ऱ्हाईल !

कोंडी : अशी बरी भांडल ! आपुन तुज्यावानी काला अक्कर भैसबराबर बायकू करनारच न्हाई !

गोजी : ये बया ! मंग कशी करनार ?

कोंडी : आपुन शिखल्याली बायकू करनार ! फस्टक्लास ब्यालिष्टर बायकू !

गोजी : कुठं पघून ठ्येवली हाये जनू ?

कोंडी : पघून ठ्यावाया कशाला पायजे ! करनार म्हंजी करनार !

गोजी : तुला त गमभनबी लिवता येत न्हाई ! मंग तुला कोन येनार आपली बालिष्टर मुलगी ?

कोंडी : तसं का ? पाया पडून येत्याल की ! व्हयन्ये, तू सांग, मला बालिष्टरा बायकू भ्येटल का न्हाई ?

सारजा : *(हंसून)* भावजी, लगीनाच डव्हाळऽ लागलं जनू ?

कोंडी : *(गोंधळून)* व्हयन्ये, मी बोलायचा न्हाई बर का !

गोजी : *(त्याच्यासमोर जाऊन आंगठे दाखवीत)* आतां का र ? आं ? मला बोलता खेपीत जसा फाटा फुटला हुता तोंडाला !

कोंडी : गप !

गोजी : तुज्या वराडन्याला मी धूप घालायची न्हाई बर का कोंडीनाना ! लेना-वळ्याला रोज जातूस, थिंतच कुनी फारशीन पघितलीस जनू !

सारजा : ए गोज्ये ! गप ! आपुन बोलू न्हाई आसं मोठ्या मानसाला !

गोजी : मंग त्यो का मला चिडवीत हुता ?

सारजा : बाये, दीसच हायेत तुमचे येकांमेकाला चिडवायचे ! तुजं लगीन होऊन तू घरीं जाशील आपल्या, भावजीचं लगीन होवून सून माजी यील घरांत–म्हंजी कुनी कुनाला चिडवायचं न्हाई !

[धोंडी डोईवर कडब्याचा भारा घेऊन येतो. त्याला पाहातांच कोंडी उठून घरांत जातो. गोजी सारजाजवळ बसून धान्य निवडूं लागते.]

धोंडी : *(भारा ओसरीच्या बाजूला टाकीत)* कोन कुनाला चिडवीत हुतं ?

सारजा : कुनी न्हाई–पोरांचं चाललं हुतं !

धोंडी : आमाला न्हाई जनू सांगायचं ?

सारजा : न सांगाया का झालं ? भावजी हिला लग्नापायीं चिडवीत हुतं —

धोंडी : *(हंसून)* काय म्हनीत हुता ? गोज्ये, सांग की ! पर त्याचं बी बरूबर हाये. सदा दाभाच्या मिलिटरींत ग्येला, आन् तिकडचाच झाला ! हिकडं पोर थोर होत चालली, त्याची गाडवाला दखल न्हाई ! ग्योज्ये, त्यो आता सुट्टीवर आला, का त्याला बांदून घालीतो, आन् तुजं लगीन करून टाकतो ! बरं का ! लाजतीस कशाला ? त्वा चिडिवलंस का न्हाई कोंडीला ?

गोजी : चिडिवलं की !

धोंडी : छान क्येलस ! काय म्हंगालीस ?

गोजी : पर दादा त्यो काई चिडला न्हाई, म्हनीत हुता—

सारजा : गप ! पोर तरी असली फाटक्या तोंडाची हाये—

धोंडी : सांग तू गोज्ये !

गोजी : त्यो म्हनीत हुता, का मी फष्ट कलास बालिष्टर बायकू करनार !

धोंडी : *(हंसतो, एकदम गंभीर होतो.)* आइकलं का ?

सारजा : जी !

धोंडी : आतां येकदा दिराचं लगीन करून टाका ! उशीर करूं नका ! नामांकित घरान्याच्या पोरी सांगून येत्यात. कुनीबी येक पसंत करा, आन उडूं द्या बार !

सारजा : मीच पसंत करूं जनू ?

धोंडी : व्हय्— पोर वाया जान्याच्या आंत —

सारजा : वाया कशानी जातय् ?

धोंडी : तुमाला काय बी उमगत न्हाई ! लवकर उरका. आन् ह्ये पघा पोर जी पसंत कराल, ती कुनावानी पायजे ?

सारजा : कुनावानी ?

धोंडी : तुमावानी ! हंसू नगस गोज्ये ! लगीन झालं, तवा तुजी काकी लई झाक दिसत हुती. लगीन झाल्यावर आमी दोगं देवाच्या पाया पडाया ग्येलतों का, तवा मी तुज्या काकीच्या त्वांडाकडे पघत ऱ्हायलों–पघतच ऱ्हायलों ! जसं मातीचं चितार !

सारजा : काय तरीच—

धोंडी : काय तरीच न्हाई ! आता काळ्या आईंत राबून राबून ध्येईची ही दशा झाली. पर हीच दशा व्हायाला हवी. आपुन काळ्या आईचीं ल्येकरं. तिच्या पुंजेंत ध्येई पडाया हावी. (एक श्वास सोडून) कोंड्याला काय ह्ये बरं वाटत न्हाई !

सारजा : न वाटाया काय झालं ?

धोंडी : (भडकून) तशी माजी संमजूत काडूं नका ? तुमाला काय वाटतंय् ? ह्यो गाडाव काय काय करतो, त्ये मला कळत न्हाई ? त्या दुद इकनाऱ्या गवळ्यांच्या नादानं ह्यो बी दुदांत पानी घालाया लागला आसल.

सारजा : न्हाई घालीत —

धोंडी : तुमाला काय ठावं ? का तुमी त्यान्च्याबरूबर चरवीत बसून जाता लोनावळ्याला ? आं ? जरूर घालीत आसल ! आरारारा ! आयाबायांचीं ल्येकरं त्येच पानी दुद म्हनून पेत असत्याल ! आर न्हान ल्येकरांना आसं फशिवनं ! वाईट वाईट !

सारजा : अव, खरंच न्हाई घालीत—

धोंडी : काय बी सांगू नका मला त्ये तसलं. ढवळ्याशेजारीं पवळा बांधला का, म्हंजी गुन न्हाई, वान मातर लागत असतो.

सारजा : माजं काईं आइकत न्हाई तुमी–

धोंडी : आइकन की ! पर पटल त्येच आइकन ! सांगा —

सारजा : त्येकरूं माजं तुमाला लई भ्येतय्—

धोंडी : तर ! वाह्यगच हाय की मी ! आन् तुमाला कसं उमागलं ह्ये ? सपान पडलं जनूं ? *(एकदम पहाटेचं स्वप्न आठवतें.)* आरे ! तुमाला सांगायचं ऱ्हायलंच पघा !

सारजा : काय ?

धोंडी : रातीं मळ्यांत झोंपलों हुतों—काळीशार झोंप लागली हुती—तर पहाटच्या राम पहाऱ्यांत एक इच्चितार सपान पडलं !

सारजा : काय पडलं ?

धोंडी : जोशीबावा आलतऽका ?

सारजा : सकाळपासून काई फिरकलं न्हाईत—

धोंडी : त्यांना सांगाया पायजे – *(जोशी येतो–)* या जोशीबावा ! शेंभर वरसं जगनार तुमीं !

जोशी : वहिनी, आलं आहे का घरांत ?

सारजा : हाय कीं !

जोशी : या चार तुकडे ! बंगाळ्याच्या पोराचा ताप कांहीं उतरत नाहीं.

सारजा : आनतीस का गोज्ये ? चुलीपासल्या टोपलींत हाय पघ ! कालच काढलं म्या – *(गोजी घरांत जाते.)*

धोंडी : किती दीस झालऽ पोराला तापून ?

जोशी : झाले दोन तीन – पण तुमी मला शंभर वर्षं कां जगवीत होतां ?

धोंडी : जगायच पायजे न् ! तुमी आसल्याबिगर गांवातल्या आजारी मानसांना आउशेद कोन देनार ?

जोशी : पण तुम्हाला औषध नको होतं —

धोंडी : बरूबर हाय – मला पायजे होता सपनाचा आरथ !

जोशी : कुणाला स्वप्न पडलं ?

धोंडी : मलाच पडलं ! लई इच्चितार सपन ! लई इच्चितार !

जोशी : काय पडलं ?

धोंडी : म्हंजी काय झालं, का जनू मी खांद्यावर श्यातावर जायला या दारांतून भाएर निंगालों–तवा —

जोशी : थांबा. केव्हां पडलं !

धोंडी : अव, सपन पघून मी उठून बसलों, तंवर बाया दळाया लागल्या हुत्या की !

जोशी : म्हणजे अगदीं पहाटेसच पडलं. बरं, तुम्ही बाहेर पडत होतां —

धोंडी : व्हय्–तिकल्यांत मला दारांत उबी न्हायलेली दिसली –

जोशी : कोण ?

धोंडी : मपली आजी ! इस्वास ठिवा जोशीबावा, ती तिच्या न्हानपनीं जशी दिमऽका, आंगा तशी !

जोशी : *(हंसून)* तिच्या लहानपणीं तुम्हीं कधीं पाहिली होतीत तिला ?

धोंडी : हसूं नका जोशीबावा, मला ती न्हानच दिसली – म्हंजी न्हानगं ल्येकरू न्हाई, पर आशी पंधरा सोळा वर्साची–*(गोजी आलें घेऊन येते, तें जोश्याला देते)* या गोजीवानी ! म्यां तिला पघितल्याबरुबर वळिखलं —

जोशी : आश्चर्य आहे !

धोंडी : व्हय्–पर अशी रखुमाईसारखी दिसत हुती ती !

जोशी : मग काय झालं ?

धोंडी : काई न्हाई, मी म्हंगालों, आज्ये, तू ? त म्हंगाली, व्हय्, मी !

जोशी : अरे ! मग ?

धोंडी : मंग मी म्हंगालो, कशाला आलीस बये ? त म्हंगाली, का मला पुन्ना या घरांत यायचंय् ! येऊं का ?

जोशी : अच्छा !

धोंडी : व्हय् जोशीबावा !

जोशी : मग तुम्ही काय म्हणालांत ?

धोंडी : मी काय तरी म्हनार, इकल्यांत जागा झालों पघा !

जोशी : आश्चर्य आहे !

धोंडी : व्हय् ! आचीर तर खरंच ! जागा झालों, अन् मग इचार करीत बसलों, का हे काय दिसलं ?

जोशी : कांहीं नाहीं हवालदार, चांगलं दिसलं तुम्हाला. आजी पुनः येणार आहे या घरांत.

धोंडी : कशाला जोशीबावा त्ये येवमानूस या घरांत आनतां आतां ? नग !

जोशी : कां हो ?

धोंडी : अवो, माज्या मागं ह्यो समदा बारदाना बसनार ! रावसाब तर खांद्यावर कावड घेऊन दुद इकीत हिंडत्यात ! मी खपलों, कीं मागं समद्या धा येकरांचा खकाना खकाना हुनार !

सारजा : अव न्हाई व्हायाचा खकाना ! भावजींना तिकतं उमागतंय्–

धोंडी : तुमी मला श्यानपन शिकवूं नका ! जोशीबावा, माज्या वाडवडलांनीं या जिमिनींत आसुदाचे पाट वाहावले – वाहावले का न्हाई त्ये सांगा !

जोशी : वाहावले कीं !

धोंडी : आंगा आश्शी ! येक माजा बापदादा त तरवार मारतां मारतां इथंच खपला. त्याच्या नांवानं ह्यो वीर मांडला हितं, त्याच्यापऽ मी रोज म्हनीत आसतों जोशीबावा–

जोशी : बोला हवालदार बोला !

धोंडी : म्हनीत आसतों, का वीर म्हाराजा, जसं तुमचं रगात सांडलं या जिमिनींत, तसं माजं बी सांडूं द्या !

जोशी : धन्य आहे हवालदार, तुमची !

धोंडी : ती विच्छा तर अपुरीच न्हायली आजून, पर म्या ही काळी आई घामानं मातर भिजिवली !

जोशी : होय हवालदार, तुमच्यासारखे कष्ट कुणी करीत नाही जमिनींत !

धोंडी *(उसासा सोडून)* इकुता खपतों मी काळ्या आईंत–कुनासाठीं ?

जोशी : सांगा कीं !

धोंडी : अव, काय सांगणार ! ज्याच्यासाठीं मी घामाचा पाट वाहावतों, त्यो गडी रोज खांद्यावर कावड घ्येऊन दुद्घ्याऽ दुद, असं गागत हिंडतो ! आरारारा ! हवालदाराच्या घरान्याची कीरत पार गंगनाला भिडवली पोरानं ! आजीला कशाला येऊं दे म्हनीतां जोशीबावा ? ह्यो तिच्या बारदान्याचा फजितवाडा पघायला ?

जोशी : हवालदार, तुम्ही जरा थंडपणं विचार करीतच नाहीं —

धोंडी : हाय का आता !

जोशी : हो हो हवालदार ! तुम्हाला वाटतंय्, कीं-हें सगळं ढेपाळतंय् – कोसळतंय्. खरं ना ?

धोंडी : तसंच त कसं ?

जोशी : तर मग आजी येत्येय हें सगळं पुनः सांवरायला. तुमच्या मदतीला येत्येय् ती. तुमच्या स्वप्नाचा हाच अर्थ आहे हवालदार ! रामपाहाऱ्यांत पडलेलीं स्वप्नं खोटीं होत नाहींत. आजी पुनः येणार या घरांत—

धोंडी : जोशीबावा –

जोशी : होय हवालदार ! ती कशी येणार हें तिनं सांगितलं नाहीं. नाहीं ना ?

धोंडी : न्हाई – पर –

जोशी : काय पण ?

धोंडी : आतां आठिवतंय् जोशीबावा मला –

जोशी : बोल कीं ! नीट आठवून काय तें सांगा !

धोंडी : ती हळदीनं न्हाली हुती !

जोशी : हळदीनं न्हाली होती ? नव्या नवरीसारखी ?

धोंडी : व्हय्—

जोशी : आश्चर्य आहे !

धोंडी : काय जोशीबाबा ?

जोशी : आजी येणार, हें तर खरंच ! वहिनी, आज एक कुमारी जेऊं घाला. आलं का लक्षांत ? ही गोजीही चालेल. बरं का गोज्ये, आज इथं जेवायला यायचं ! चलतों मी —

सारजा : जोशीबाबा, तुमी पर शिधा घिऊन जा की !

जोशी : काढून ठेवा, मी पोराला काढा देऊन मग येईन न्यायला.

धोंडी : जोशीबावा, मीबी चलतों की पोराची तब्येत पघाया !

जोशी : चला कीं ! *(दोघे जातात.)*

गोजी : काकी, आतां व कसं ?

सारजा : काय झालं ?

गोजी : दादांची आज्जी म्हंजी तुमची आजे सासू झाली की !

सारजा : व्हय्—

गोजी : ती घरीं यायची – म्हंजी मंग – तुमाला ताक दुद द्यायचं आसलं कुनाला त तिला इच्यारून द्यावं लागलं !

सारजा : *(एकदम डोळे भरून येतात. पदरानें पुसते.)* गोज्ये पोरी —

गोजी : काय झालं व काकी ?

सारजा : *(सांभाळून)* काय न्हाई ! पर आजेसासू येनार आसलं, तर तिला येऊं द्ये !

गोजी : कशापाईं ?

सारजा : मी दुर्बल बाईमानूस ! हे दोघऽभाऊ दोन बाजूंना वढीत्यात ! यांची एक तऱ्हा, त कोंडीची तिसरीच तऱ्हा ! मला काईं ह्ये वझं उचलेना झालं !

गोजी : वझं ? कसलं वझं ?

सारजा : तुला न्हाई उमगायचं पोरी ! ऱ्हाऊं द्ये–

गोजी : सांगा कीं काकी –

[केरबा येतो]

केरबा : ही हितं बसली जनू गप्पा हाकीत ! गोज्ये, तुजी आय तिकडं वरडू वरडू थकली पार !

गोजी : मंग ? मी काकीचं काम करीत न्हवत्यें का ?

केरबा : तिक्तं काकीच्या कामाचं निमित सांगितलं का झालं ! काकीचं काम, ह्यो इस्पीकचा येक्का ! त्यो दावला म्हंजी म्होरं कुनी काय बी बोलत न्हाई ! जा पळ !

गोजी : काकी, ज्यावायचं तिक्तं सांगा बरं का बाला !

सारजा : व्हय् ! केरूभावजी, आज दुपारीं गोजी हिकडं ज्यावायला यील बरं का !

केरबा : न्हाई तर कवा घरीं जेवती ती ? सदा न् कदा तुमाला दत्तक धिल्यावानी हिकडंच तर आसती ! जा घरीं वले ! धाकला कल्हापून रडऽतोयू ! *(गोजी जाते)* व्हयनी, मूग आवंदाचा जनू ?

सारजा : व्हय् !

केरबा : कसा हाय् मोत्यावानी दाना ! छा ! श्येती करावी हवालदारानं ! आमचं श्येती करनं फुकाट !

सारजा : तसं व का केरूभावजी ?

केरबा : न्हाई तर काय ! कसं तरी कोमडीनं चिवडल्यावानी नांगरायचं, आन् त्यांत दाना पिस्कारून द्यायचा ! उगवलं त्ये वसाकू वसाकू कापायचं, बकाबका हादडायचं !

[कोंडी घरांतून खांद्यावर धोतर घेऊन येतो.]

कोंडी : म्यां कवां हादडलं र केरदा ?

केरबा : आर तुजं न्हाई मरदा !

कोंडी : मंग कुनाचं ?

केरबा : आमचं सांगत हुतों मी !

कोंडी : आसं व्हय ? मंग सांगा सांगा !

सारजा : भावजी, आंगुळीला निगाला जनू ?

कोंडी : मंग नको जाऊं ? इच्या मारी त्या म्हशीनं दमिवलं इक्ता येळ !

केरबा : का झालं ?

कोंडी : म्होरकीच घालू येईना ! मंग जवा का धरून हानली, तवा कुटं मऊ सूत आली ! व्हयन्ये, बायांची जात ही आशीच पघ !

सारजा : त काय ! व्हयनीफुडं चालतोयू ह्यो तोरा ! सवताची बायकू आली, म्हंजी मंग नाकांत येसन आडकावाल, आन् दोरी तिच्या हातीं येऊन ती धावडवील तिकडं धावाल !

कोंडी : हूं ऽऽ ! पघ तिला धरून हानतों का न्हाई त्ये !

सारजा : बालिष्टर बायकूला ?

केरबा : बालिष्टर बायकू ?

सारजा : व्हयू ! भावजी कुनी बालिष्टर बायकू करनार हायेत जनू ! बघितली आसल कुनी फारशीन लोनावळ्याला !

केरबा : हूं कोंडीबा ! उठू द्या दनका ! बालिष्टर बायकू आन् दुदवाला न्हवरा ! ठ्यां !

कोंडी : केरूदादा, मी बोलायचा न्हाई बरं का ! मी लई वाइट्ट मानूस हाये !

केरबा : व्हय् र वाइट्ट मानसा ! तुला अंगाखांद्यावर खेळिवला हाय कीं म्यां ! कितीदां माजा आंगरखा वला क्येला हायेस ! *(घराच्या बाजूनें वुइंगमधें बोलणें ऐकूं येऊं लागतें—)* आं ? ह्ये कोन आलं बा ? वळखीचा दिसत न्हाई !— *(खांद्यावर धोतर, डोईवर फेटा, कोट अशा वेशांत जनार्दन गोपाळे येतो. तो आला त्या दिशेकडे तोंड करून बोलूं लागतो.)*

जनार्दन : ह्या वाटेनं ? नीट ?

आंतला आवाज : व्हय् व्हय् !

जनार्दन : डावी वाट टाकून उजव्या हातानं ?

आंतला आवाज : व्हय् व्हय् !

कोंडी : कोन ? तुमी ?

जनार्दन : *(त्याच्याकडे बघून)* ओ हो हो ! कोंडीबा, ह्ये घर जनू तुमचं ?

कोंडी : व्हय् – पर – तुमी—

जनार्दन : मला जायाचं हाये वाघजाईला – आमची सरूबाय फायनलला बसली, तवा नवस बोल्लों होतों—

केरबा : वाघजाई हितून तीन कोस ! ह्यो पल्याडला डोंगार उलाटला का, म्हंजी वाघजाईचाच डोंगूर दिसतोय् ! हीच वाट नीट जाती थितं. पर कोंडी वळखीचा हाये जनू ?

जनार्दन : हाये कीं ! रोज लोनावळ्याला येत्यात न्हाई का कोंडीबा ? थितं पानी प्यायाला घरीं येत्यात.

कोंडी : न्हव – पर —

जनार्दन : काय ?

कोंडी : येकलेच जनू ?

जनार्दन : न्हाई – हाये कीं बरूबर ! तिच्या वळखीची कुनी भ्येटली, तिच्या संगट बोलती, ईल आत्तां.

कोंडी : व्हयन्ये, मी जातों आंगुळीला — *(निघतो.)*

केरबा : तसं र का कोंडी ? वळखीचं मानूस आलं, काई त्याला पानीबिनी इच्यारायचं–का तूच त्येवढा जानार पानी प्यायला ?

धोंडी : हाय की व्हयनी – ती इच्यारील— *(पळतो.)*

केरबा : आं ? ह्या असा बुजल्या गोऱ्ह्यावानी काय कराया लागला ?

जनार्दन : *(हंसून)* असूं द्या असूं द्या, या हवालदारीनबाई जनू ?

केरबा : व्हय्– *(सारजा मर्यादेनें पदर डोईवर घेत आंत जाते. पाण्याचा तांब्या घेऊन बाहेर येते.)*

जनार्दन : हवालदार कुटं ग्येले ?

केरबा : त्ये ग्येलऽकुटं भाएर, पर आपुन कुटं आसतां ?

जनार्दन : व्हय्, त्ये न्हायलंच कीं सांगायचं — लोनावळ्याला मुंशिपाल्टींत आसतों मी. जेनार्धण गोपाळे माजं नांव !

सारजा : गोपाळे ? गोपाळे म्हंजी —

जनार्दन : म्हंजी शिरगांवचे —

केरबा : आर इच्या ! मारी म्हंजी आमचे सोयरेच म्हना की !

जनार्दन : म्हना की न्हाई, सोयराच हाये मी हवालदारांचा. मांज्या चुलत्याची मावळन ती हवालदारांची आजी.

सारजा : *(चमकून)* आजी ?

जनार्दन : व्हय् ! न्हानपनांपुन तिकडं मुंबईकडं हुतो, म्हून कंदीं गाठ पडली न्हाई

सारजा : तुमची मुलगी—

जनार्दन : हाय कीं बरबर—

सारजा : शिकली जनू—

जनार्दन : व्हय्, फायनल झाली–आर, आलीच की ! या सरूबाय ! *(त्याच दिशेनें येते.)* ह्या थोरल्या हवाळदारीनबाई ! *(सरू वर चढून सारजेला नमस्कार करते. सारजा तिच्या तोंडाकडे कांहीं वेळ बघत राहाते–मग तिला एकदम धरून घरांत घेऊन जाते.)* लय शानी हाय पोर माजी ! काई सांगावं लगत न्हाई !

केरबा : का सांगावं लागलं ! पोर कुनाची हाये ! हवालदारांच्या सोयऱ्यांची ! *(बघून)* आर वा ! ह्ये आलच जनू—

[धोंडी येतो.]

धोंडी : आर केरबा, तुजी गाय का र लंगडती ?

केरबा : लंगडती ?

धोंडी : तर काय ! धिला असशील दांडुकन्याचा तडाखा ठिवून ! आर, मुकं जनावर हाये त्ये ! त्येला काई उमगतं का ! ? आं ? आसं मारू न्हाई !

जनार्दन : रामराम हवालदार ?

केरबा : ह्ये हवालदार !

धोंडी : रामराम ! म्यां काई वळिखलं न्हाई !

जनार्दन : वळखायचं काई कारनबी न्हाई. पर मी शिरगांवचा जेनार्धण गोपाळे ! लोनावळ्याला आसतों.

केरबा : ह्ये गोपाळे !

धोंडी : आर ! म्हंजी सोयरच की !

जनार्दन : व्हय् !

धोंडी : आर मंग उभ्याउभ्या कशापायीं ? (*खुंटीवरली घोंगडी टाकतो*) बसा की ठेपशीर ! आइकलं का ? सोयरे आल्यात !

जनार्दन : तुमी काई काळजी करूं नका हवालदार ! पानी आलं, समदं आलं, तुमी बसा !

धोंडी : काई ज्यावनखान ? आइकलं का ?

जनार्दन : (धोंडीचा हात धरून) त्ये हुईल मागून ! तुमी बसा पघूं ! हां, आम्ही ! मी चाललोंय् वाघजाईच्या दरशेनाला.

धोंडी : आर मंग ज्यावल्याबिगर जायाचं न्हाई ! ऊन्ह उतरूं द्या, मंग सांजच्या पारी जा वाघजाईला !

जनार्दन : त्ये मंग पघूं ! आदुगर येक काम उरकून टाकू ! आज, उद्यां, कवातरी करायाच पायजे !

धोंडी : बोला !

जनार्दन : सपष्ट सांगायचं —

धोंडी : आपल्याजवळ आंत भाएर कायबी न्हाई ! इच्यारा !

जनार्दन : भावाचं लगीन कवा करायचं ?

धोंडी : *(एकदम गंभीर होऊन)* किसन्या, त्यो बैल त्वांड घालतोय् पघ

मुल्यांत! बाजूला काड त्येला!

जनार्दन : हवालदार, जबाब धिला न्हाई ?

धोंडी : त्याचं असं हाये सोयरे, भाऊ माजा येकच. ढमाले घरान्याचा वंस त्योच चालिवनार. मला त्येकरूबाळ न्हाई. तवा लगीन करायचं त्याचं, ह्ये तर खरंच! पर–

जनार्दन : आता पर काय ?

धोंडी : *(ताडकन् उठून किल्ल्याकडे हात दाखवीत)* ह्यो किल्ला पघा सोयरे! सवता शिवाजी राजानं किल्लेदारी सांगून मपल्या बापदाद्याच्या कमरेला तरवार बांधली!

जनार्दन : समदं ठावं हाये मला – पर भावाच्या सोयरिकीचं —

धोंडी : हवालदाराचा सबूद मोत्यावानी अवघा पवनपट्टा झ्येलीत आला! हवालदारानं बोलावं, आन् पवनपट्टयानं त्या सबूदापायीं आपलं आसूद सांडावं! ह्यो मानमर्तब कसा आला हवालदाराचं घर पुसत? हवालदारांनीं आपला जीव अवघ्या पवनपट्टयाच्या पायतळीं पायघड्या करून आंथरला! सोयरे, मागं इष्टमिंट सायेब आला इनामाचे कागुद पघायला. हवालदारांनीं आपले कागुद त्याच्या म्होरं टाकले. सायेब बोलला, पास हायेत! मंग त्यानं पुसलं, या समद्या पवनपट्टयांतल्या लोकांचे कागूद दावा! खरं का न्हाई क्येरबा ?

केरबा : व्हय्!

धोंडी : तवा हवालदार बोलले, ही समदी माजी परजा! शिवाजीराजाच्या फौजंत ह्या समद्यांनीं तरवार मारली!

केरबा : आंगा आश्शी!

धोंडी : तर सायेब बोलला, तसं चालायचं न्हाई! यांची जिमीन मी खालसांत घालीतो! तवा हवालदार भडकला! सायेबाच्या घोड्याचा लगाम धरून बोलला, आर जा खालसांत घालनाऱ्या! आज पिढ्यान् पिढ्या जीं मानसं सवराज्यापायीं खपलीं, त्यांची जिमीन खालसा करनारा तू कोन? खरं का न्हाई केरबा ?

केरबा : खरंच आन्! खोटं कसं आसल ?

धोंडी : तवा सायेब घोड्यावरून खालीं उतरला – टोपी काडली. हवालदाराला सलाम क्येला. म्हंगाला, हवालदारा, समदा पवनपट्टा तुज्या नांवानं करीतों! तवा

हवालदार म्हंपाला, नग तसलं ! कुनाची जिमीन ? राजाची ! त्यानं धिली कुनाला ? या शिपाई मर्दांना ! ती त्यांची त्यांच्याकडे आसु द्या !

जनार्दन : तुमचं घरानं नेकीचं सोयरे !

धोंडी : तवाधरनं हवालदाराचा सबूद म्हंजी कौल झाला ! हवालदारांनीं दो दो हातांनीं लुटिवलं – पवनपट्ट्यानं हजार हातांनीं झ्येललं ! हिकडे या सोयरे – *(शेताकडे जाऊन)* हे पघा, हवालदारांनीं या काळी आईवर कसं पिरीम क्येलं ! निसतं पिरीम न्हाई, सरधा ठिवली हिच्यावर वाडवडलांनीं ! तवा ह्या धरतीनंबी काई कमी धिलं न्हाई ! हवालदार घरान्यावर तिनं अशी किरपा क्येली, का हवालदारांनीं मिशी उच्च करावी !

जनार्दन : खरं हाय हवालदार ! खरं हाय !

धोंडी : आजपत्तुर म्यां मिशी उच्च ठिवली–योक क्यास काई खालीं झुकूं धिला न्हाई ! पर–

जनार्दन : बोला हवालदार ! गंगाबाईच्या पान्याला खण्ड पडूं द्येऊं नका !

धोंडी : पर–मला आमच्या भाऊसाहेबांचं लक्षेन कांहीं धड दिसत न्हाई !

जनार्दन : का ?

धोंडी : का म्हून इचारतां सोयरे ? अव त्यो दुदऽऱ्या दुद म्हनून लोनावळ्याच्या गल्ल्या-गल्ल्यांतून हिंडतो !

जनार्दन : मला ठावं हाय–

धोंडी : तिकऱ्यानं भागलं न्हाई ! त्यो वाईट मानसांच्या नादानं वाया चालला !

जनार्दन : का करीतो ?

धोंडी : अव शिग्रेटी का काय म्हंत्यात त्ये वढीतो–

जनार्दन : आनीक ?

धोंडी : आता कसं सांगू ? अव परवा कोल्हाटनीच्या गान्याला ग्येल्ता !

जनार्दन : मला समदं ठावं हाये—

धोंडी : ठावं हाये ?

जनार्दन : व्हय् ! मीबी लोनावळ्यालाच न्हातों-पघतों मी समदं. धंदा कुंचाबी करावा मानसानं– धंद्यायेरवीं मपली काई तक्रार न्हाई–जवान मानूस हाये–जरा

हिकड–तिकड व्हायाचंच. तुमचा भाऊ मला पसंत हाये– आन् माजी पोर ह्यानी हाये–ती त्याला ताळ्यावर आनील !

धोंडी : मंग तुमी अन् आमची कारभारीन पघून घ्या !

जनार्दन : तसं कसं सोयरे ? तुमाला सवताला मुलगी पघावी लागेल—

धोंडी : पर—

जनार्दन : पर न्हाई, ती हितं आली, माज्या संगट !

धोंडी : हितं ? तुमच्या संगट ?

जनार्दन : व्हय्-घरांत हाये ती ! बाये सरसुती–

धोंडी : (*चमकून*) काय म्हंगालांत ?

जनार्दन : सरसुती—

धोंडी : अव ह्ये तर माज्या आजीचं नांव !

जनार्दन : आसं ?

[तों सारजा सरूला घेऊन आंतून बाहेर येते.]

सारजा : सूनबाये, जा तुज्या थोरल्या दिराच्या पाया पड ! *(सरू धोंडीकडे एकदां मर्यादेनें पाहात त्याच्याजवळ येऊन त्याला नमस्कार करते.)*

सरू : नमस्कार करत्यें दादा ! *(या वेळेपर्यंत धोंडी आश्चर्यानें विमूढ होऊन तिच्याकडे पाहात राहातो. मग एकदम त्याच्या डोळ्यांतून घळघळा आंसवें वाहूं लागतात. भरल्या आवाजांत तो बोलूं लागतो.)*

धोंडी : आइकलं का ? हीच माजी आजी ! आज रामपहारीं मला सपनांत दिसली हुती–ह्येच नाक, ह्येच डोळे, असाच गंगाजळावानी चेहेरा ? ये आज्ये, ये ! तुजं घर सावराया ये ! आज्ये, कुनी आइकेना झालं ग तुज्या ल्येकराचं ! त्याला सांभाळाया ये ! आइकलं का ? कुकू आनून लावा तुमच्या सुनेला–माज्या आजीला !

पटाक्षेप

अंक दुसरा

प्रवेश पहिला

[गोजी ओटीवर बसून पाटीवर ग काढायची धडपड करीत आहे.]

गोजी : (स्वतःशींच) गनपतीवानी सूंड काडायची, आन् मंग रावळाचा योक खांब काडायचा. ही सूंड काडली – आतां खांब कुटं द्यायाचा ? ह्या आंगाला, का ह्या आंगाला ? ये बया ! काईबी उमगना झालं ! सरूव्हयनी ! अव सरूव्हयनी !

[आंतून सरू येते.]

सरू : काय झालं गोजाबाई ?

गोजी : अव ह्यो या गचा खांब व कुटं काडायचा ?

सरू : बघूं ? *(तिची पाटी पाहून)* हें हो काय ? या सोंडेवर टिकल्या कसल्या काढल्या आहेत ?

गोजी : कंच्या ? ह्या व्हयू ? ते गंद हाये गंद ! गनपती काडल्यावर त्याला गंद नको का लावाया ?

सरू : *(हंसून गोजीच्या गालाला हात लावीत)* शहाणी ग माझी बाई ती! पण सध्यां नुसतीच सोंड काढायची.

गोजी : विनागंदाची ?

सरू : होय.

गोजी : गनपतीम्हाराज रागवायचऽ न्हाईत जनू ?

सरू : नाहींत. तर अशी ही सोंड काढायची, अन मग हा असा त्या सोंडेच्या डाव्या अंगाला खांब काढायचा.

गोजी : एकाच खांबाचं राउळ ?

सरू : हो, एकाच खांबाचं. तेवढं काढलं, कीं गणपतीचा ग झाला !

गोजी : सरू व्हयनी, तुमी सवता हितं थांबा, अन् मपल्याकडून ह्ये समदं काढून घ्या ! गनपतीचा ग, मक्याचा म–

सरू : वा वा! अन् घरातलीं कामं कोण करील ?

गोजी : कुचीं व कामं करावीं लागत्यात तुमाला ? सारजाकाकी त काई तुमाला कामाला हात लाऊं येत न्हाई !

सरू : म्हणून काय झालं गोज्ये ! त्यांच्या हाताशीं नको असायला ?

गोजी : व्हयू सरू व्हयनी, येक इचारूं का ?

सरू : विचार कीं ?

गोजी : आगदीं यावाशिप्पत सांगाल का ?

सरू : खरं सांगायला शप्पथ कशाला घ्यायला पाहिजे गोज्ये ?

गोजी : मंग सांगा बगूं ! ह्ये घर आवडलं का ?

सरू : आतां वर्षभर तूं मला पाहात्येस गोज्ये ! तुला नाहीं का कळलं ?

गोजी : काय व ?

सरू : मला घर आवडलं कीं नाहीं तें ?

गोजी : व्हयू ग बाये व्हयू ! तुला घर लई आवडलं ! पर आनीक येक इचारीतें– लाजूं नका ?

सरू : विचार कीं–

गोजी : आमचा कोंडीदा कसा काय हावे ?

सरू : नवरा कसा आहे तें बायकोला विचारूं नये गोज्ये !

गोजी : बरं बरं बरं ! न्हायलं ! सारजाकाकी कशा हायेत ?

सरू : गंगेच्या पाण्यासारख्या —

गोजी : आन् थोरलऽ हवालदार !

सरू : देवाचं वर्णन करूं नये गोज्ये !

गोजी : का व ?

सरू : करणाराच थकतो ! नुसती त्याची भक्ति करावी–

[आंतून कोंडी भरली कावड घेऊन लोणावळ्याला जायच्या तयारीनें येतो.]

कोंडी : धाकल्या हवालदारीनबाई हितं हायेत जनू ? तिकडं वरडतां वरडतां माजा घसा पार बसाया आला.

सरू : जरा गोजीला **ग** काढायला शिकवीत होत्यें.

कोंडी : शिकवा शिकवा–पर आमचा तमाखूचा बटवा कुटं ठिवला ?

सरू : खिशांतच ठेवला कीं सकाळींच !

कोंडी : (*बघून*) आर इच्या मारी ! व्हयू कीं ! मी उगाच गागत हुतों–

गोजी : कोंडीनाना, काय गागत हुतास ?

कोंडी : म्हंजी तसा गागत न्हवतो–ह्यांना हाका मारीत हुतो.

गोजी : मंग आता संबूर मार की !

कोंडी : गोज्ये, नाक धरून वढीन बरं का !

गोजी : तसं र का ? आं ? निसतं नांव घ्याया सांगितलं, त असा लांडग्यावानी खाखावतो कशाला ?

कोंडी : हितं कोन खाखावतोय् ! निसतं म्हंगालों, का नाक धरून वढीन–वढलं का ?

गोजी : न्हाई वढलंस खरं ! पर घे की नांव — (*सरू आंत जाऊं लागते, तिला धरीत*) का ग पळून चालली सरू व्हयनी ! थांब — हां कोंडीनाना, घे पटकन् नांव !

कोंडी : आर इच्या मारी ! मंग घ्येतलंच पायजे नांव म्हना कीं ! निसत्या धाकल्या हवालदारीनबाईनीं न्हाई भागायचं ?

गोजी : न्हाई–ए व्हयने, पळूं नगस–हां, घे ! सादं नगस घिऊं बरं का !

कोंडी : मंग काय बाया घेत्यात, तसलं आखाना म्हनून घेऊं ?

गोजी : व्हय् व्हय्- पर पटकन् घ्ये म्हंजी झालं !

कोंडी : घ्येतों बरं का—आडभींतीची पडभींत—पडभिंतीला आला पोपडा, त्यावर थापा शेनी, शेनी देऊन घ्या लोनी, लोन्याचं करा तूप, तूप वाडा बामनांना, बामन जेवले भराभरा, ढयेकरा धिल्या ढराढरा, बामनांना धिले विडे, विड्यांत खैराचा काथ, कोकनची सुपारी, भेंडीबाजारच्या लवंगा, नळबाजाराची येलची —

गोजी : ए येलचीवाल्या, लवकर संपीव कीं तुजं गुन्हाळ —

कोंडी : झालं, उलीसक् ऱ्हायलं—नळबाजाराची येलची, अशी येलची तशी येलची, येलची हाये इकल्याली—तुंगीगडाचा कोंडीबा हवालदार सहीची निशानी आंगठा, पर त्याची बायकू सरसुती हाये लय शिकल्येली !

गोजी : वार कोंडीनाना ! वार शिकल्याल्या बायकूचं नांव घेन्याची तुजी रीत ! मंग बायकू शिकल्याली हाये, त तुज्या पोटांत का टोचतंय् !

कोंडी : मपल्या पोटांत कशाला टुचल ? लोक म्हंत्यात त्ये मी म्हनीतों —

सरू : ऐकलं का ?

कोंडी : काय म्हनीता ?

सरू : तुम्ही मला धाकली हवालदारीण म्हणत जाऊं नका !

कोंडी : मंग काय म्हनीत जाऊं ?

सरू : दादा बाईंना हांक मारतात तसं —

कोंडी : म्हंजी निसतं—आइकलं का ?

सरू : हो —

कोंडी : आर इच्या मारी —

सरू : आपल्या घराण्यांत तेंच शोभा देतं —

कोंडी : आर इच्या मारी ! मंग आनखीन् येक गोष्ट करा की — आपल्या घरान्याला सोभनारी !

सरू : कोणती ?

कोंडी : तुमच्या सासूबाईच्या अंगावर पन्नास पन्नास तोळे सोनं हुतं *(खिशांतून वज्रटीक काढीत)* मंग तुमीबी ह्ये इकतं घाला कीं गळ्यांत ! कशी हाये ?

सरू : चांगली छान आहे कीं ! कुठं करवली ?

कोंडी : लोनावळ्याच्या दत्तू सोनारानं सवता पुन्याला जाऊन करून आनली !

सरू : चांगला घाट आहे !

कोंडी : आवडली का ?

सरू : न आवडायला काय झालं ?

कोंडी : मंग इक्ती गळ्यांत घाला, अन् व्हयनीच्या पाया पडा की !

सरू : दादांना दाखवलीत का ?

कोंडी : दादाला कशाला दावाया पायजे ?

सरू : असं कसं बरं ? ते या घरांतले वडील ! त्यांना विचारल्याशिवाय या घरांत कोणतंही काम करायची रीत नाहीं.

कोंडी : म्हंजी आसं म्हना की—

सरू : काय ?

कोंडी : का माजा दुदाचा पैका तुमालाबी कडू लागतो —

सरू : पैका कसा कडू लागेल ? पण मी या घराण्याची सून नाहीं का ?

कोंडी : म्हंजी माजी बायकू न्हाई —

सरू : असं लागट कां बोलतां ? हा पवनपट्टा पहा, हा तुंगीगड, हवालदारी दहा एकर, दादा, बाई – मग तुम्ही, अन् तुमच्या नंतर मी ! मला या सगळ्यामधून वेगळं कसं काढतां येईल तुम्हांला ?

कोंडी : मंग तुमीबी फितूर झाला म्हना की !

सरू : तुम्ही असं कांहीं तरीच बोलूं लागलांत, तर माणसानं उत्तर कसं द्यायचं ?

कोंडी : काई न्हाई ! लगीन करून काई माजं बरं झालं न्हाई ! उगाच शिकल्याली बायकू पघून मी फसलों— *(वज्रटीक खिशांत घालून तणतण पाय वाजवीत निघून जातो. सरू खांबाला धरून त्याच्याकडे उदासपणें बघत राहाते.)*

गोजी : *(तिच्याजवळ जाऊन तिच्या खांद्यावर हात ठेवीत)* व्हयन्ये—

सरू : *(हंसून डोळे पुशीत)* कांहीं नाहीं ग गोज्ये ! तसे हे मनाचे अगदीं मोकळे आहेत. फक्त राग आला, कीं भडाभडा बोलून टाकतात, एवढंच !

गोजी : (*तिच्या खांद्यावर डोकें टेकीत*) तू लई झ्यानी हायेस् व्हयन्ये ! तुज्यावानी बायकू म्यां पघितली न्हाई !

[कोंडी गेला, त्याच्या विरुद्ध दिशेनें धोंडी येतो. खांद्यावरली घोंगडी खुंटीवर ठेवतो.]

धोंडी : काय म्हंगालीस गोजे ?

गोजी : काय न्हाई.

धोंडी : न्हाई कसं ? तूं म्हनीत हुतीस, का तुझ्या न्हान्या व्हयनीवानी झ्यानी बायकू त्वा कुटंबी पघितली न्हाईस —

गोजी : व्हय् —

धोंडी : आंगा आश्शी ! मीबी हेच सांगतों समद्या गावाला – पर माजं कुनी आइकत न्हाई ! झ्यावटीं आज करनार येक इगत ! सूनबाई – हां हां ! अशा घरांत पळूं नका ! काय इगत करनार सांगा पघूं ?

सरू : मला काय माहीत दादा ?

धोंडी : (*मोठमोठ्यानें हंसत*) इत्की झ्यानी आसूनबी म्हाईत न्हाई ! आर इच्या मारी ! आसूं द्या आसूं द्या ! मीच सांगतों – (*पागोट्याच्या टोकांत बांधलेलें जुनें वर्तमानपत्र काढतो, सरूला दाखवतो*) हे पघा ! (*गोजी जाऊन त्याच्या हातांतून वर्तमानपत्र घेऊं लागते–*) अगा थांब थांब ! गोज्ये, तू तर निसती घनमुसळीच हायेस ! म्या किती जपून आनला ह्यो कागूद ! सूनबाई, घ्या ! (*सरू वर्तमानपत्र घेते*) आंगा आश्शी ! हां, आतां मंडळी येत्याल समदी. त्येंना फडाफड वाचून दावा ! येकदां मनांतल्या मनांत वाचून ठिवा–म्हंजी मंडळी आल्यावर जड जायाचं न्हाई !

सरू : (*हसूं दाबीत*) मनांत वाचायची कांहीं जरूर नाहीं दादा !

धोंडी : न्हाई न्हाई ! आइका माजं येड्याचं. ठिवा येकदां वाचून. वाचल्यालं वाया जायाचं न्हाई. कुंचंबी काम क्यालेलं वाया जात न्हाई ! हां, तर मंडळी आल्यावर त्यांना सुद्द, सपाष्ट, येकेक आक्षेर वाचून दावा ! त्यांना इस्वास पटूं द्या, का धाकल्या हवाल्दारनीवानी बाई जगांत कुटंबी घावायची न्हाई !

सरू : दादा —

धोंडी : काय हाय ? बोला कीं !

सरू : नाहीं–मला एवढंच म्हणायचंय्–कीं माझ्याहून फार फार शिकलेल्या खूप बाया आहेत—

धोंडी : *(अविश्वासाच्या स्वरांत)* म्हंजी तुज्यावानी फायनल झाल्याल्या ?

सरू : फायनलला काय करतां दादा ? पुष्कळ पुष्कळ ! बी. ए., एम्. ए, डॉक्टर–

धोंडी : तूं काय सांगतीस मला सुनबाई ! डागदारं हुनं येगळं, आन् तुज्यावानी लिवतां वाचतां येनं येगळं ! डागदार लई झालं, तर नाडी पघल ! लिवतां वाचतां कसं यील त्याला ?

सरू : तो डॉक्टर नव्हे दादा–डॉक्टर म्हणजे –

धोंडी : त्यें तसलं विंग्रजी कायबाय सांगून मला फसवूं नगस सूनबाई ! म्यांबी लई जेग पघितलं ! पर तुज्यावानी श्यानी बाई मला कुट्टं कुट्टं घावली न्हाई— आइकलं का ? *(आंतून सारजेची हांक "जी !")* हिकडं या भाएर ! ही सूनबाई म्हनीती, का तिच्यापून लई शिखल्याल्या बाया लई हायेत —

सारजा : *(दाराशीं येत)* व्हय् सूनबाई ? मंग आसल तसं !

धोंडी *(भडकून)* काय आसल ? तुमालाबी काई कळत न्हाई ! [किसना येतो] का र किसना, आमच्या सूनबाईवानी शिखल्याली बाई त्वां कुटं पघितलीस का ?

(सारजा पुनः आंत जाते.)

किसना : न्हाई–

धोंडी : घ्या ! किसनापून तरी उलीसंक् श्यानपन शिका ! हां–का र किसना, गल्लींत शिरतांना कुनी दिसलं का ?

किसना : व्हय्–म्या घालवून धिलं त्याला –

धोंडी : आर कुनाला ?

किसना : येक गाडाव ! त्यो हिकडं शिरत हुता, म्यां धिला हाकलून !

धोंडी : हाय का ! आर गाडवा, कुनी मानूस दिसला का हिकडं येताना ? जोशीबावा, केरबा, सोनबा, गनशा वानी —

किसना : आसं आसं ! त्ये व्हय् ? येत्यात. ह्ये आलच पघा !

धोंडी : हां, मंग ती घोंगडी टाक बसाया ! या या जोशीबावा ! *(गोजी सरूच्या कानांत कांहींतरी सांगून घरीं पळते.)* [जोशी, केरबा, सोनबा, गनशा वाणी असे

चारसहा जण येतात.] बसा बसा तसं घोंगडीवर ! आर गनशा, घोंगडीवर बस की अवघ्याहून येगळं तुजं तिकडम् का र ?

गनशा : ठीक है कीं हितं ! कशाला बलिवला हविलदार ?

घोंडी : गनशा, तुजं लिवनं किती ?

गनशा : माजा कुठला लिवना ? घराच्या घरींच बब्बानीं हिसाब ठिसाब लिवायला पढवला !

घोंडी : हात् तुज्या खळ्यांत कोमडी हागली !

केरबा : घोंडीदा, कशापाईं बलिवलंय् ?

घोंडी : आर बसा की ! बसल्यानं काई खालीं वाळवी लागत न्हाई —

केरबा : त्ये झालं –

घोंडी : हां, सूनबाई, दावा वाचून फडाफडा ! या, हितं बसा अशा ! तुमची आजी-सासू आजूसासऱ्याच्या घोड्याशीं घोडा भिडवून शिकार कराया जायची ! लाजायचं न्हाई – हां ! चालूं द्या ! (*सरू समोर बसून वर्तमानपत्र पसरते*) आं ? उलटं कशापाईं ? सरळ धरा कीं !

सरू : दादा, तुम्ही समोर बसले आहांत ना ? म्हणून उलटं दिसतंय्—

घोंडी : आसं व्हय् ? आर इच्या मारी ! हां, चालू द्या भन्नाट गाडी—

सरू : वर्तमानपत्र फाटकं आहे दादा !

घोंडी : आसूं द्या – तुमी वाचा—

सरू : याचें पर्यवसान कशांत होईल ? आज कांहींच निर्णय करतां येत नाहीं. तें रशियाच्या आन्तरिक सामर्थ्यावर अवलंबून आहे. पण आमचा होरा असा वाहातो, कीं शेवटीं रशिया जर्मनीला त्याच्या घरांतच कोंडून घालील. असें झालें म्हणजे—(*थांबते.*)

घोंडी : का झालं सूनबाई ?

सरू : इथून पुढला कागद फाटलाय् ?

घोंडी : फाटूं द्या फाटूं द्या ! का केरबा, आलं का ध्येनात ?

केरबा : काई आलं, काई न्हाई आलं !

घोंडी : का का आलं सांगा पघूं ?

केरबा : असं आलं, का ह्यो जरमिळ आन् ह्यो रश्या, दोगांची चालली कुस्ती !

धोंडी : चालली कुस्ती, बरं ! म्होरं ?

केरबा : तर कवा तरी ह्यो रश्या जर्मिळ सायबाला त्येच्या घरांत कोंडून घालनार !

धोंडी : आंगा आश्शी ! बरुबर उमागलं !

सोनबा : म्हंजी कौराव पांडवावानीच म्हना की !

धोंडी : आंगा आश्शी !

सोनबा : पर हवालदार, ह्या दोगानला इत्कं भांडाया कारान काय झालं ?

धोंडी : *(क्षणभर डोळे मिटून)* बाया बरं या ! बाया ! शितामाईच्या पाई रामायेन घडलं – धुरपतीच्या पाई म्हाभारत ! या जरमिळ सायबानं ह्या रश्याची बायकू पळवली आसल !

सगळे : आंगा आश्शी !

धोंडी : *(हातानें तोंड झांकून हंसणाऱ्या जोशाकडे पाहून)* का झालं जोशीबावा ?

जोशी : कांहीं नाहीं –

धोंडी : सूनबाई, झाला का समदा कागुद ?

सरू : मजकूर झाला, आतां जाहिराती आहेत –

धोंडी : आं ? मंग त्या कशापाई ऱ्हाऊन येता ? पार समदं वाचून दावा ! योक आकशेर काई ऱ्हाऊं दयेऊं नका –

सरू : श्रीगोपालकृष्ण ताक भांडार – आमच्या इथें उत्तम, ताजें, निर्भेळ गाईचें ताक स्वस्त दरांत मिळेल – विशेष सूचना, आगाऊ नांवें नोंदविणारास ताजें गाईचें गोमय सवलतीच्या दरांत मिळेल. नांवें आमच्या मुगभाटांतील दुकानांत नोंदवावींत.

धोंडी : आँ, म्हंजी काय सूनबाई ?

सरू : दादा, मुंबईच्या ताकाच्या दुकानाची जाहिरात आहे ही !

धोंडी : अरारारारा ! आतां बोलायजोगं काई ऱ्हायलं न्हाई ! पुरऽ झालं सूनबाई ?

जोशी : अहो हवालदार, अलिकडे नवरा पाहिजे म्हणून जाहिराती येतात ! अमुक एवढा उंच, अमुक एवढा जाडा, रंगानं जरा उजळ, नाक कसंही असलं तरी चालेल, अमुक रुपये पगारवाला, अमुक वर्षांचा – असा नवरा पाहिजे.

धोंडी : म्हंजी तसं म्हना की - अमुक इतक्या सालांचा - चार न्हाई तर आठ दात उगावल्याला, नीट सरळ शिंगांचा, ढवळ्या रंगाचा - आसा बईल पायजे —

जोशी : होय होय, तसंच —

धोंडी : काई खरं ऱ्हायलं न्हाई - काईबी - ऱ्हायलं न्हाई —

जोशी : (*उठत*) असूं द्या हवालदार! पहावत नसेल तें समोर आलं, तर डोळे मिटावेत, अन् स्वस्थ बसावं! जरा आंत वहिनींकडे जाऊन येतों.

धोंडी : तुमा दिराभावजयीचं काई ठरायचं हाये जनू?

जोशी : अहो सत्यनारायणाची पूजा बोलल्या होत्या, ती राहिली आहे कधींची! एक साल व्हायला आलं! कोंडीचं लग्न झालं, तेव्हांपासून आज करूं उद्यां करूं चाललंय्.

केरबा : म्हंजी तुमाला दक्शिना मिळवायची घाई झाली जनू?

जोशी : अरे केरबा, दक्षिणा मिळवायला सत्यनारायणच कशाला पाहिजे? बोल, तुझ्या घरून आणूं आत्तां सवापांच रुपये? तुझ्या बायकोला जाऊन सांगतों, कीं केरबाला शनी वक्री आहे, शांति करायला पाहिजे! पट्दिशीं पैसे काढून दील! (*आंत जातो.*)

केरबा : धील बाबा! भटांचं बरं हाये! कुनी जलमलं, तरी दक्शिना! गमावलं, तरी दक्शिना—

धोंडी : तुज्या र का पोटांत दुकतंय्? तूं मागत जा की दक्शिना! होळीचा सन आलाय् जवळ! घरोघरीं जावाव, मंतार म्हनावा, अल्याड गंगा पल्याड गंगा ठो ठो ठो ठो ठो! का काडा म्हनाव दकशेना!

केरबा : (*हंसत*) मला कशी दक्शिना मागतां ईल? पान्याचा मासा आभाळांत कसा उडल?

धोंडी : चट उडतोय्! तरवार मारनाऱ्यांचीं पोरं दुद न्हाई का इकाया लागलीं?

जोशी : (*आंतून मुळ्याच्या जुडया घेऊन बाहेर येत*) हवालदार, वहिनी म्हणतात, सत्यनारायण पटकन् उरकून टाका. देवाचं कांहीं रहायला नको—

धोंडी : (*आश्चर्यानें*) देवाचं काईबी ऱ्हायला नग? पर आसं कंदी बोलत न्हाई ती!

जोशी : आज बोलल्या!

धोंडी : आसं? (*पटकन् तो घरांत जातो. त्याच्यामागें सरू.*)

केरबा : जोशीबावा, व्हयनी शीक हाय जनू?

जोशी : प्रकृति जरा मऊ दिसली खरी!

केरबा : ती कंदीबी आजारी पडल्याली आपल्याला ठावी न्हाई!

सोनबा : बरं का केरबा, हवालदारांचा लई जीव बरं व्हयनीवर!

केरबा : व्हयू! पर वर वर दावीत न्हाईत!

जोशी : केरबा, या गोष्टी सांगायच्या का असतात? फणसासारखं आहे हवालदारांचं—

[धोंडी सचिंत मुद्रेनें येतो.]

धोंडी : जोशीबावा, सत्येनारायेन उरकून टाका बरं का!

केरबा : काय झालं हवालदार?

धोंडी : आर काय पर झालं न्हाई! पर झालं न्हाई म्हंजी काय हुयाचंबी न्हाई? मानसाचा का भरंवसा सांगता येतोय्?

जोशी : हें काय बोलतांय् हवालदार?

धोंडी : (*मोठमोठ्यानें हंसून*) जोशीबावा भेल्यात जनू? काई न्हाई जोशीबावा, मी आपलं एक जगाच्या न्हाटगाडग्याचं सांगत हुतों. भरल्याला लोटा रिता व्हायाचाच कंदी तरी!

जोशी : पण वहिनीची प्रकृति—

धोंडी : बरी हाय अजून—पर तुमी म्हूर्त पघा पघू!

जोशी : मुहूर्त काय पघायचा! आज आठा दिसा पौर्णिमा—पण दोन आहेत वाटतं!

धोंडी : पंचांगन आनाया सांगूं का?

जोशी : हो हो—

धोंडी : सरूबाय, तिक्कं घरांतलं पंचांगन आना पघूं! [सरू पंचांग घेऊन येते.] नगा नगा! जोशीबावाला देऊं नगा! त्यांत पघून सांगा, का पुर्निमा दोन हायेत का योक—

सरू : (*पाहून*) दोन आहेत दादा—दुसरी संध्याकाळीं चार वाजेपर्यंत आहे—

जोशी : अरे! मग ती उपयोगीं नाहीं—

धोंडी : *(गर्वानें)* का जोशीबावा, कसं हाये सरूबाईचं काम ?

जोशी : मोठी गुणी आहे हवालदार तुमची सून !

केरबा : गनशा, ल्योका तुजा जनम फुकाट ! बाया तुज्या पुढं चालल्या !

गनशा : फुकाट तर फुकाट ! अरे बेपारीला जी गोस्ट फुकाट मिळाली, तिचा तो टका करते बाबा–चलतों हवालदार !

केरबा : आर आमीबी येतो की–धोंडीदा, चलतों, काव्या तोडायच्या हायेत– *(तिघे जातात.)*

जोशी : मग सूनबाई, आज आठा दिसा पौर्णिमा–त्या दिवशीं सत्यनारायणाची कथा बरं का ?

धोंडी : आइकलं का जोशीबावा,—

जोशी : काय ?

धोंडी : आतां जानकार मानूस हाये घरात. तुमची ढइनकीन काई सोडूं नका ! चांगलं सपष्ट संस्कुत वाचायला पायजे—

जोशी : ठीक आहे–माझं काय बिघडलं ? एकदा नैमिषारण्येपासून करतों सुरवात ! चलतों — *(जातो.)*

धोंडी : सरूबाय, कुटं निंगाल्या ?

सरू : जरा बाईकडे—

धोंडी : थांबा जराशीक—

सरू : कांहीं काम आहे का ?

धोंडी : व्हय्– हिकडे हिरीकडे या ! *(दोघे विहिरीकडे जातात.)* ह्यो माळवा पघा सूनबाय ! त्यो मुळा, त्ये कांदे, त्या मिरच्या—

सरू : *(आश्चर्यानें)* मी तर रोज बघतें दादा !

धोंडी : आज पुन्ना येकदां पघा !

सरू : पण हें कशासाठीं दादा ?

धोंडी : *(आग्रहपूर्वक)* पघून घे बाये, ह्ये पघून घ्ये येकदा–म्हन का म्या माळवा ह्याक राखला हाये–काई कमी ठ्येवली न्हाई—

सरू : तुम्ही कसं कांहीं उणं ठेवाल दादा ?

धोंडी : *(डोळे मिटून उभा राहातो – मग एकदम घडघडा बोलूं लागतो.)* सरूबाय, आजी ग्येली, तवा मी न्हान हुतो – तिनं शेवटच्या खिनाला मला जवळ घ्येतलं ! जीव जायाचा–पुन्ना यायाचा ! आसं दोन चार डाव झालं ! धाव्या अकराव्या दिशीं पिंडाला कावळा शिवे ना ! आजानं हात जोडून सांगातलं, का बाये, तुज्या श्यातांची म्हेनत मी जीव लावून करीन ! तवा कुटं शिवला — *(पुन: थांबून डोळे मिटतो.)*

सरू : काय झालं दादा ?

धोंडी : काय पर झालं न्हाई बाये ! ती माजी आजी परत आली. आपल्या श्याताची वज कशी राखली नातवानं त्ये पघाया—

सरू : दादा—

धोंडी : *(आग्रहपूर्वक)* इस्वास ठ्येव बाये, तू माजी हायेस ! पघा, ह्यो माळवा पघा ! ही ओकती पघा ! येक सांगू का सरूबाय ?

सरू : सांगा कीं दादा !

धोंडी : लई डाव माज्या मनांत आलं, का हिरीवर मोटवन बांदावं.

सरू : मग कां बांधलं नाहींत दादा ? चांगलं दिसलं असतं !

धोंडी : आंतून मला सारखं वाटऽका कंदीतरी आजी परत येनार ! ती आल्यावर तिला ह्ये समदं दावाया पायजे–जसं हुतं तसं ! म्हून म्यां राकलं ह्ये समदं ! येक ठ्येकूळ काई इकडलं तिकडे क्येलं नाही !–खरं वाटतं तुला ?

सरू : तुम्ही कशाला खोटं सांगाल दादा ?

धोंडी : पर लोकांना न्हाई वाटत खरं ! माजं कुनी आइकत न्हाई ! माजं कुनाला उमगत न्हाई ! मागं लोक म्हंत्यात, कां धोंडी हवालदार येडा हाये—

सरू : जे असं म्हणतात, त्यांना कांहीं कळत नाहीं दादा !

धोंडी : बाये माज्या, तुला उमगतं माज बोलनं ?

सरू : सगळं उमगत नाहीं दादा ! पण मला माहीत आहे, तुम्ही कधींच खोटं सांगणार नाहीं !

धोंडी : *(एकदम तिचे दोन्ही हात हातांत धरून)* बाये, मंग आतां येक हो म्हन !

सरू : काय दादा ?

धोंडी : तू आदुगर हो म्हन – म्हन बाये ! आईक तुज्या ल्येकराचं ! म्हन हो !

सरू : दादा—

धोंडी : आवगड जातंय् जनू ? बरं, आदुगर नगस म्हनूं, सांगतों आईक ! ह्यो समदा भार तू तुज्यावर घ्यातलास आसं म्हन !

सरू : भार म्हणजे काय ?

धोंडी : घ्येतला म्हना सरूबाय ! आमाला मोकळं करा यातून !

सरू : कशांतून दादा ?

धोंडी : आतां कसं सांगू बाये ? आजपत्तुर कुनाला सांगितलं न्हाई – कुनाला उमागलं नसतं ! पर तू वंशाची ज्योती हायेस ! तुज्यापऽ समदं सांगितलं पायजे– आइकशील ?

सरू : पण हें सगळं आत्तांच सांगितलं पाहिजे का ?

धोंडी : व्हय बाये व्हय ! एक चाक निखळून पडायला पघतंय्—

सरू : चाक ?

धोंडी : इच्यारू नगस बाये ! आइकत्यें म्हन !

सरू : (*डोळे पुशीत*) आइकत्यें दादा !

धोंडी : आज्ये, केवढं तुज्या कुळाचं मोठेपन ! येक्या अंगाला ह्यो तुंगीगड उभा, दुसऱ्या अंगाला आभाळाएवढं मोठेपन घेऊन तुजं कुळ उभं ! राजानं तरवार बांधली कमरेला, तवा थोरला ढमाला सवराज्यापायीं या धा एकरांतल्या झुंजींत खर्ची पडला हुता, आन् धाकला आसुदानं भरलेला त्याच्या शेजारी उबा हुता ! लढाईंत झाल्याल्या घावांनीं समदं शेरीर भरलं हुतं ! पळसाला फुलं येत्यात तसं ! तवा सवता राजानं पाठ थोपाटली – बाये माज्या त्या बापदाद्याची पाठ सवता राजानं थोपाटली, आन् हवालदारी सांगून कमरेला तरवार बांधली--येवढा पवनपट्टा सोधीन क्येला ढमाल्यांच्या !

सरू : (*भरून येऊन*) दादा, अशा कुळांत मी आल्यें—केवढी भाग्यवती मी !

धोंडी : व्हय् बाये ! तू दर जल्मीं याच कुळाची ज्योती हुतीस ! आतां पुन्ना आपला ठाव पुशीत आलीस ! तर ह्यो येवढा सगळा भार म्यां आजत्तुपर सांभाळला.

काई कमी पडूं धिलं न्हाई मपल्याकून. (*उसासा टाकून*) पर बाये, आतां काई मला धड गत दिसेऽना !

सरू : काय झालं दादा ?

धोंडी : इच्यार हुता, का कोंडीच्या गळ्यांत ह्ये समदं घालीन, आन् आमी दोगं हळूच यांतून निघूं! पर त्यानं मानलं न्हाई ! कुळाला सोबत न्हाई त्ये करून बसला—

सरू : दादा —!

धोंडी : न्हाई माज्या आज्ये ! कष्टी होऊं नगस ! तू कष्टी झालीस, तर मपल्या जिवाला डागन्या बसत्याल ! सांग, रागावलीस तू ल्येकरावर तुज्या ? चुकलं माजं काई ? (*सरू पटकन् त्याच्या पायांना हात लावते. तिला उठवून तिच्या डोक्यावर हात ठेवीत*) सरूबाय ! किती बरं वाटलं मपल्या जिवाला ! आसं वाटऽका या ल्येकराचं येडेपन मायला आवडतं का न्हाई ! पर ह्य तुमीं सरतं करून घ्येतलं ! मला गंगेंत आंगूळ केल्यावानी वाटलं ! मंग बोला !

सरू : काय दादा ?

धोंडी : ह्यो भार घेतला असं म्हना !

सरू : कसला भार ?

धोंडी : या बारदान्याचा !

सरू : पण भार घ्यायचा म्हणजे काय करायचं ?

धोंडी : निसता घ्येतला आसं म्हनात्येंच !

सरू : मग काय होईल ?

धोंडी : मंग मला इस्वास हुईल बाये ! माजं मन मला सांगल, का आता काळजी करायचं कायबी कारन न्हाई ! ह्यो समदा भार हवालदार कुळाच्या कुळवतीनं उचेलला हाये —

सरू : पण हें आजच केलं पाहिजे का ?

धोंडी : व्हय् बाये !

सरू : आज तुमचं मन फार हळुवार झाल्यं—

धोंडी : (*गडबडीनें*) व्हय् बाये व्हय् ! उशीर हुतोय् ! आमचा जोडीदार जायाचं म्हनीतो —

सरू : (*आश्चर्यानें*) म्हणजे ?

धोंडी : उमगलं येळ आली म्हंजे ! म्हना, का भार घेतला ?

सरू : दादा, तुमचं समाधान होणार असेल, तर म्हणतें,—हा भार मीं घेतला !

धोंडी : आसं म्हना, का ह्यो बारदाना माजा हाये —

सरू : दादा, मला हें कांहीं कळत नाहीं, पण तुमच्यावर विश्वास आहे माझा. तुम्ही कराल, तें घराण्याच्या हिताचंच असेल. वाईट तुमच्या हातून स्वप्नांतही घडायचं नाहीं — तेव्हां —

धोंडी : म्हना सरूबाय म्हना !

सरू : तेव्हां म्हणत्यें, कीं हें सगळं वैभव ढमाले घराण्याचं — त्या घराण्याची मी सून — हें सगळं माझं आहे !

धोंडी : (*घाईघाईनें घरांत जात अतिशय आनंदानें*) आइकलं का ? ह्ये समदं कंत्राट धाकल्या हवालदारीनबाईनीं आजपून आपल्या गळ्यांत घेतलं ! आतां तुमाला सुट्टी !

[घरांत जातो. त्याच्याकडे आश्चर्यानें पाहात सरू त्याच्या मागोमाग ' ''ते.]

. . . . प्र

वे

श

दुसरा . . . .

[मार्गे : भिम्या हातीं वाख घेऊन लंगडत येऊन धोंड्यावर बसतो. दोरी वळूं लागतो. मार्गे शेतांतून भोरड्या उडवायचा आरडा सुरू होतो. भिम्या हांकारतो.]

भिम्या : अऽकेरदा ! केरदा हऽ ! (*आंतून वो ! अशी हांक*) का वरडतां उगा भोरड्यांवर ? खाईनात का विचाऱ्या मूठपसा ! या या ! वाईच तमाखू खाऊन जा !

प्रवेश ❋ दुसरा

केरबा : (*प्रविष्ट होऊन*) भिम्या, मी वरडतो भोरड्यांवर, तर तुज काई खरसलं जनूं ?

भिम्या : माजं कशानं खरसतंयू ? पर भोरड्याबी येवाघरचाच जीव हाये !

केरबा : व्हयू ! पर त्येंनीं का समदं श्यात खावावं ? कुनीकून येत्यात काय नू ?

भिम्या : अव धा येकरांत हवालदार आनू किसन्या, व–वरडत्यात. त्येंच्या शाळू-वर काई येक भोरडी बसायची न्हाई ! रातदीस निसता ठ्या चालल्याला असतो. म्हून मंग त्या हिकडं येत्यात.

केरबा : (*बसून*) काढ तमाखू !

भिम्या : माज्यापं कुठली ? तुमच्या खिशांतली काहाडा कीं !

केरबा : का ? दुदांत पानी घालीत हुतास, त्यो पैका खपला जनूं ?

भिम्या : पान्याचा पैका पान्यांतच खरसला. कोरटांत दंड झाला.

केरबा : मंग आतां लई गरिबी आली जनूं ?

भिम्या : न्हाई त काय ? पायाला ह्ये दुखनं आल्यापून लोनावळाबी बंद झालं !

केरबा : मंग दुद कोन न्येतो र ?

भिम्या · न्येतो भिम्या ! करतो काईबाई !

केरबा : घ्ये ! (*तंबाखू देत*) पर माजी तमाखू काई तुला ग्वाड लागायची न्हाई.

भिम्या : का व ?

केरबा : आर ती काई कडक न्हाई !

भिम्या : आसू द्या कशीबी ! तिक्कंच माजंबी त्वांड बंद, तुमचं बी बंद !

केरबा : भिम्या, तू म्हनलास खरं, पर आतां हवालदाराचं ध्यान काई शाळूकडे न्हाइलं न्हाई !

भिम्या : का व ? लई शीक हाये जनू सारजाकाकी ?

केरबा : तिच्या दुखन्याचा काई ब्येतच उमगनां झाला. कवा हात पाय थंडगार पडत्यात, त कवा पुन्ना जीव परत येतो !

भिम्या : आर इच्या मारी !

केरबा : व्हय मरदा !

भिम्या : मंग काई दवादारू ?

केरबा : आर समदं चाललंय्. वान्याचं औशीद झालं—जोशीबावा सारका उशा-पायथ्याशीं बसून हाये ! आमची गोजी त काई घरीं येतच न्हाई ! रातदीस तिकडंच !

भिम्या : मंग काई भायेरचं आसल् ! पघावं का न्हाई ?

केरबा : कुनीं पघावं ?

भिम्या : का ? हवालदार का करीत्यात ?

केरबा : त्ये निसते वठ्यावर बसून आसत्यात. त्यांना मी म्हंगालो, का काई भाएरचं आसल, त देवलशी आनूं का ?

भिम्या : मंग ?

केरबा : त्ये म्हंगाल ऽ, का आपुन कुनाचं काईबी वाईट क्येलं न्हाई. कोन कशापाई आपल्यावर करनी करील ?

भिम्या : आर पर काई भूत ह्येत—

केरबा : हवालदारांचा इस्वास हाये, का आपल्या घरान्यांत आजपत्तुर कुनाला भुतानं धरलं न्हाई !

भिम्या : येड्यांच्या इस्पितळांतच ठ्यावाया पायजे हवालदाराला ! मरा म्हनावं !

केरबा : आर आसं बोलूं न्हाई भिम्या ! व्हयनीवानी बाई दिसायची न्हाई !

भिम्या : खरं हाये—पर मंग लोनावळ्याला कोंडी जातो, थितून त्यो कुनी चांगला डागदर का आनीत न्हाई ?

केरबा : काय की बाबा ! काय हुनार काई उमगत न्हाई आपल्याला ! कोंडी तुजा दोस्त हाये, तवा तू सांगू न्हाईस त्याला ?

भिम्या : लई दिसांत त्याची गाठच पडली न्हाई. आतां पडली म्हंजी सांगन् ! का व उठला ?

केरबा : आर जातों ! पाखरं शाळूचा उडवतील फन्ना ! योक दाना काई घावायचा न्हाई ! (जातो. भिम्या पुनः हाताला थुंकी लावून दोरी वळूं लागतो. तोंच किसमा पुळ्या घेऊन येतो.)

भिम्या : किसन्या कुटं ग्येलता र ?

किसना : तुला काय करायचं हाये ? रिकामा न्हावी, भितीला तुंबड्या लावी !

भिम्या : आर पर सांग की !

किसना : जोशीबावानीं वडगावाला धाडलं हुतं—

भिम्या : कशापाई ?

किसना : थोरल्या व्हयनीचं आउशेद आनाया ! (*जाऊं लागतो*)

भिम्या : आर ए किसन्या ! आईक !

किसना : जातों वले ! दादांना घरीं सोडाया पायजे. शाळूकडऽकुनी न्हाई. रामपारींच मला जोशीबावांनीं वडगावाला दवडलं हुतं !

भिम्या : जाशील वले ! का र किसन्या, धाकल्या हवालदारनीला कोंडीनं डाग केले हुते ना ?

किसना : व्हयू —वजरटीक आन् पाटल्या केल्या हुत्या !

भिम्या : मंग ?

किसना : दादा नगं म्हंगाले —

भिम्या : आर पर का ? नगं म्हनाया असा काय घोंडा पडत हुता तुमच्या दादाच्या वळ्यांत ?

किसना : भिम्यादा ! ह्ये आसलं इच्यारायचं कारन न्हाई !

भिम्या : आर इच्या मारी !

किसना : व्हय तर काय ! कुनी कुनाला डाग करू, न्हाई तर न्हाई करू ! तुला बसल्या बसल्या लोकांच्या दुखन्यांत काड्या घालायचा संबंद न्हाई !

भिम्या : आरारा ! लई खवळला जनू !

[किशा जातो. पुनः भिम्या दोरी वळूं लागतो. तों थकलेला कोंडी कावड घेऊन येतो. मुकाट्यानें घाम पुशीत भिम्याजवळच्या धोंड्यावर बसतो. भिम्या अगोदर बोलतच नाहीं.]

कोंडी : का र भिम्या !

भिम्या : का झालं हवालदार ?

कोंडी : काई बोलला न्हाई !

भिम्या : न्हाई बोललों बाबा ! तुमी मोठ्या घरचीं मानसं ! तुमी मोठऽ तुमचे गडी मोठे ! उगा किसनावांनी तराटणी धिली म्हंजी !

कोंडी : कुनीं धिली तराटणी ! किसन्यानं ?

भिम्या : आर, म्यां निसतं इच्यारलं, का व्हयनीचं कसं हाये ! त डोळऽ काढून म्हंतो कसा, का चोंबडेपना करायचं कारान न्हाई !

कोंडी : आर तिच्या ! थांब, पघऽ तों त्याच्याकडंऽ !

भिम्या : ए बाबा ! पघूं बिघूं नगस ! पर व्हयनीचं कसं हाये ?

कोंडी : (*उदास होऊन*) भिम्या, आपल्याला काई व्हयनीच्या तोंडाकडे पघवऽ ना झालं !

भिम्या : आर काई डागदर क्येला का न्हाई !

कोंडी : दादाचा इस्वास न्हाई डागदरावर ?

भिम्या : समद्या जगाचा हाये, आन् तुपल्या दादाचाच न्हाई !

कोंडी : न्हाई !

भिम्या : इचितारच हाये—

कोंडी : (*थोडा वेळ थांबून*) भिम्या, तुजं म्हननंबी खरं हाये ! दादाचं वागनं लई इचितार हाये—मलाबी अलिकड्—

भिम्या : काय ?

कोंडी : काई न्हाई ! लई राग यायला लागलाय् दादाचा !

भिम्या : (*पिचकारी टाकून पुढें सरत*) आंगा आइशी ! आमीं पयल्यापासनं सांगत हुतों, तर आमचं काई आइकत न्हवता—

कोंडी : म्हंजी तसा काइ दादा वाईट न्हाई खरा—पर इचितार मात्तर हाये—

भिम्या : अव, गाडवाचं नांव गोपाळशेट ! कोंडीबा, धाकल्या व्हयनीला डाग करूं दिलं न्हई म्हन हवालदारांनी ?

कोंडी : (*तोंड फिरवीत*) न्हाई—

भिम्या : आन् मंग लुगडीं बिगडीं—

कोंडी : काई पर न्हाई–

भिम्या : आर मग चंडाळा, इकूता पैसा भ्येटतो, त्याचं काय करीतो तू ?

कोंडी : (*अस्वस्थपणें उठत*) गाडग्यांत घालून पुरून ठेवीतों !

भिम्या : दादा काय म्हनीतो तुजा ?

कोंडी : त्यो म्हनीतो, का ज्या दिवशीं घरांत येक पैसा खरसलेला दिसल, त्या दिवसापून माजं त्वांड काई दिसायचं न्हाई—

भिम्या : मंग तुझीं कांबरुनं ? आंगरखा, धोतर, फ्येटा—

कोंडी : समदं दादाच आनीतो !

भिम्या : आरारारा ! मंग जो पैका खरसतां येत न्हाई, असा पैका काय कामाचा ?

कोंडी : म्यां ठरिवलंय्—

भिम्या : काय ?

कोंडी : दादासंबूर नोटांचा ढीग करायचा, आन् त्याला काडी लावून द्यायची ! मंग ती इभूत कपाळाला फासायची, आन् जोग घेऊन निघून जायाचं !

भिम्या : आराराराराा ! कोंड्या, तू दादाला न इच्यारतां डागदर का आनीत न्हाईस व्हयनीला पघाया ?

कोंडी : न इच्यारतांच ?

भिम्या : तर काय ? गागल गागल, आन् गप बसल ! इकता पैका हाये, त्यो काय कामाचा ?

कोंडी : आर व्हयनीच्या जिवाफुडं मला पैक्याचं कवतिक न्हाई ! माजा जीव कुनीं मागितला, तर त्योबी द्याया मी कमी करायचा न्हाई व्हयनीपाई—

भिम्या : तुपल्या बायकूपरीस ज्यास्ती पिरीम हाये जनू व्हयनीवर ?

कोंडी : व्हयनी माजी आय हाये–(*गोजी घामाघूम होऊन धांवत येते.*) कोन ? गोज्ये ?

गोजी : (*घाबरलेल्या स्वरांत*) कोंडीनाना ! तुला सरूव्हयनीनं बलिवलंय्–चल !

कोंडी : कशापाई ?

गोजी : हवालदारीन काकी–चल !

कोंडी : (*आरडतो*) व्हयन्ये ! आये माज्या ! (*धांवत जातो. त्याच्या मागोमाग भिम्या.*)

..........प्र वे श तिसरा ....

[जोशी आणि केरबा घरांतून बाहेर येतात.]

केरबा : जोशीबावा, काई दान धरम ?

जोशी : विचारलं मीं—

केरबा : मंग ?

जोशी : वहिनी म्हणते, मीं हवालदारांची सेवा केली जन्मभर, मला आतां कसलंही पुण्य जोडायचं राहिलं नाहीं !

केरबा : ह्ये मात्तर खरं बरं का !

जोशी : खरं तर काय ! वहिनी गेल्यानं जो खड्डा पडेल, तो भरून यायचा नाहीं केरबा—

केरबा : का ? धाकली हवालदारीन—

जोशी : खरं आहे तुमचं म्हणणं—सरू कांहीं उणं पडूं द्यायची नाहीं कुठंच. पण थोरल्या हवालदारांचं म्हणत होतों मी – (*सरू दारांत उभी राहून जोशाला हांक मारते. तिचे डोळे भरून आले आहेत.*)

सरू : जोशीकाका—

जोशी : काय ग बाई ?

सरू : दादांना बाहेर आणा !

जोशी : कां ग ?

सरू : ते पोत्यांत डोकं खुपसून बसले आहेत ! (*जोशी आंत जातो.*)

केरबा : मी येऊं का जोशीबावा ?

जोशी : (*आंतून*) लागलं तर हांक मारतों–

केरबा : सूनबाई, काई खाल्लंस का न्हाई ?

सरू : कांहीं जात नाहीं–

केरबा : आन् गोजी ?

सरू : तिला बळें बळें अर्धी भाकरी खायला लावली–

केरबा : मंग ? तूं का खात नाहींस ?

सरू : किनई तात्या, असं जगावेगळं कधीं पाहिलं नाहीं मीं ! घरांतलं एवढया मोलाचं माणूस जातंय्–पण तीं दोघंही रडत नाहींत, आरडत नाहींत ! जशीं कांहीं कडू विषाचे घोटच्या घोट ताठपणं पिऊन जाताहेत !

केरबा : व्हय् बाये–हवालदार लई ताठ मानूस !

सरू : म्हणून तर मला धास्ती वाटते तात्या !

केरबा : कसली धास्ती बाये ?

सरू : बाई मला म्हणाल्या–कीं दादांचा भार तुझ्यावर टाकून जात्येंय् मी ! ते कधीं आपलं दुःख उघड करायचे नाहींत. स्वतःच सोशीत जातील. पण हें ओझं इतकं जड असूनही मला खांद्यावर घ्यावं लागलं तात्या ! बाईंनीं अशा शब्दांत माझ्याकडून वचन घेतलं, कीं हो म्हणण्यापलिकडे दुसरा उपाय नव्हता !

केरबा : व्हय् बाये ! हवालदार जगायेगळा मानूस हाये ! किल्ल्याचा कडा पघितला का, म्हंजी हवालदाराची आठवन हुती–

सरू : म्हणून तर मला भय वाटतं तात्या, कीं दादा आपलं मन उघडं करून सांगायचे नाहींत–अशा माणसाजवळ असणं फार अवघड आहे–

[जोशी धोंडीला धरून बाहेर येतो.]

जोशी : असं काय करावं बरं दादा लहान लेकरासारखं ?

धोंडी : *(शोक रोधलेल्या स्वरांत)* काय क्येलं मीं जोशीबावा ? रडलों ? गागलों ? ही माझी आजी हाये हितं–तिनं सांगावं, कंदीं माज्या डोळ्यांतून येक टिपूस भाएर पडला ? आतां समदा आनंद हाये जोशीबावा ! काई दुःखीक करायचं न्हायलं न्हाई ! तिच्याकून झालं, तंवर तिनं आपल्या मायेच्या पदराखालीं अवघ्यांना घेतलं ! गाई, गुजी, पांखरं, कुत्रे–तिला लेकरूं न्हवतं जोशीबावा, पर हीं समदीं तिचींच लेकरं हुतीं आजपत्तुर ! असा सगळा सोहोळा तिनं भोगला–आन् ती आज भरल्या

कपाळानं जायाला निंगाली ! (*तोंड हातांनीं झांकून घेतो–नंतर उमाळा फुटावा तसा बोलतो*) माज्या सारज्ये !

सरू : दादा ! (*त्याच्याजवळ जाऊन त्याच्या कुशींत शिरून रडूं लागते. धोंडी तिला थोपटतो.*)

जोशी : हें काय पोरपण चालवलंय् तुम्हीं दोघांनीं ? तुम्हीच जर अशीं ढासळलांत, तर लोकांनीं काय करायचं ?

धोंडी : (*जणूं चाबूक खाल्ल्यासारखा जागा होऊन*) सरूबाय, रडायचं नसतं ! हवालदाराच्या कुळवंतीला ह्ये सोबत न्हाई !

सरू : पण रडूं आवरत नाहीं हो दादा !

धोंडी : आवरलं पायजे बाये ! आवरलं पायजे ! खरं हाये जोशीबावाचं ! आपुन दोगं अशीं ढ्येपाळलों, तर मंग गांव तर बांध फुटल्यावानी आरडाया लागल् ? जा, जाऊन बस तिच्याजवळ — जा बाये जा ! (*सरू आंत जाते.*)

जोशी : हवालदार, तुम्ही बसा बघूं इथं !

धोंडी : काय सांगाल त्ये करतों जोशीबावा ? आतां समदा आनंद हाये ! (*जाऊन बसतो.*)

केरबा : कोंडी न्हाई आला जनू आजून ?

जोशी : नाहीं –

केरबा : पोर पार उतरला या आठ दिवसांत –

धोंडी : केरबा, आर बायकू ज्यास्ती का आई ज्यास्ती ?

केरबा : ऑं ? आतां तसं पघाया ग्येलं तर — दोगीबी सारक्याच की !

धोंडी : (*विषण्णपणें हंसून*) तूबी पुन्या मुंबईचं बोलाया लागलास केरबा ! आसंबी चालल, तसंबी चालल — आर, म्हराठ्यावानी येक बोल की ! न्हाई तर ठावं न्हाई म्हन !

केरबा : ठावं न्हाई आपल्याला !

धोंडी : आंगा आश्शी ! छाती फुडं काढून आसं खरंबी बोलतां यीना झालं अलिकडं मानसांना ! आर, आई ज्यास्ती ! बायकू दुसरी भ्येटल–आई भ्येटायची न्हाई !

केरबा : ह्ये मात्तर खरं बरं का !

धोंडी : तर आईक केरबा ! कोंड्याची आई चालली ! पोराचं लई पिरीम तिच्यावर

(सरू दारांत उभी राहून हांक मारते.)

सरू : दादा !

धोंडी : काय बाये ?

सरू : तुम्हाला बोलावलंय् बाईनीं – तुमच्या मांडीवर डोकं ठेवायचं म्हणतात –

धोंडी : जाऊं का जोशीबावा ?

जोशी : हें काय विचारणं झालं ? *(धोंडी जातो.)*

सरू : तात्या, यांना बघायला धाडतां का कुणाला ?

केरबा : व्हय् –

सरू : जा – यांचा धोसरा काढलाय् बाईनीं ! *(केरबा जातो.)*

जोशी : सरू, एक विचारूं का तुला ?

सरू : विचारा कीं !

जोशी : कोंडीला कांहीं सांगितलन् का वहिनीनं ?

सरू : हो –

जोशी : काय ?

सरू : म्हणाल्या, हा दुधाचा धंदा सोडून द्या –

जोशी : मग काय म्हणाला तो ?

सरू : हे म्हाणाले, कीं यापेक्षां जीव द्यायला कां सांगत नाहींस ?

जोशी : मग ?

सरू : बाईनीं यांचा हात सोडून म्हटलं, इच्छा तुमची ! मग त्यांनीं तोंड फिरवलं !

जोशी : मग ?

सरू : मग कांहीं नाहीं ! हे पागोट्यांत तोंड खुपसून पोत्याला टेकून बसून राहिले. बराच वेळ बसले – नि मग एकदम उठले. म्हणाले, वहिनी, मी तुला मरूं द्यायचा नाहीं !

जोशी : मग ?

सरू : धांवत जाऊन यांनीं गाडगं उकरलं ––

जोशी : गाडगं ?

सरू : दुधाचे पैसे ठेवलेलं ! पण सगळ्या नोटा वाळवीनं खाल्या होत्या !

जोशी : अरेरे !

सरू : ओरडून म्हणाले, वहिनी, तुम्ही दोघं तुमचा शब्द खरा करा ! दुधाचा एक पैसा तुमच्यासाठीं खर्च होऊं देऊं नका ! पण म्हणे, माझी शपथ आहे – मी परतेपर्यंत जीव सोडूं नकोस ! म्हणून तर सारखा त्यांचा धोशा सुरू आहे–जोशीकाका, आतां अगदींच आशा नाहीं का हो ?

जोशी : बाई ग ! आतां वैद्यो नारायणो हरिः ! [तों घामाघूम झालेला कोंडी, न्येनबा, केरबा, भिम्या, गनशा वाणी, एक डॉक्टर असे घाईघाईनें येतात.]

सरू : आले—

कोंडी : न्हाई न्हाई – बूट काडायचं कारन न्हाई ! तशेच आंत या डागदर साएब ! (त्याला घेऊन आंत जाऊं लागतो, तों आंतून धोंडी येऊन दारांत उभा राहतो.) दादा, सर बाजूला –

धोंडी : का र मुला ?

कोंडी : डागदरसाब आल्यात — (*धोंडी जाग्यावरून हलत नाहीं.*)

जोशी : असं काय करतांयू हवालदार ! कोंडीनं एवढा खर्च करून डॉक्टर आणला–

धोंडी : अरारारा ! डागदरसाब चालत आलां जनू !

डॉक्टर : तर काय ! इतकं लांब गांव आहे, हें अगोदर सांगितलं असतं तर मी आलोंच नसतों !

धोंडी : सूनबाई, डागदरसाबांना गूळपानी आना ! किसना, केरबाच्या घोड्यावर खोगीर घालून आन डागदरसायबांसाटीं – त्यांना नीट मळवली टेशनापत्तुर पोंचवून ये !

डॉक्टर : म्हणजे ?

कोंडी : दादा, सर बाजूला – व्हयनीला तपासायचं !

धोंडी : म्हंजी काय हुईल ?

डॉक्टर : अहो पावणे, रोग्याला तपासायला नको ? पाहिल्याशिवाय औषध द्यायला मी काय धन्वंतरी आहें ?

धोंडी : अरारा ! आपुन धन्वंतरी न्हाई जनू ? मंग निसतेच टोचाटोची करनारे ?

कोंडी : (*ओरडतो*) दादा !

धोंडी : (*मऊ शब्दांत*) असा आरडा काय करावा कोंडीबा ! आपल्या घरान्याला ह्ये सोबत न्हाई ! तुजी व्हयनी पंढरीच्या वारीला निंगाली – तिला शांत मनानी जाऊं दे —

कोंडी : (*दरवाजाकडे घुसत*) या तुमी डागदरसाब – (*डॉक्टर दाराकडे निघतो.*)

धोंडी : डागदरसाब, आपुन चला ! इकुल्यांत घोडं यील आपलं !

सरू : असं काय करतां दादा ? डॉक्टरांना कमींत कमी बघूं तरी द्या बाईंना !

धोंडी : बाये माज्या, काय पघती तिला ? ती निंगाली आपल्याला सोडून !

सरू : पण शेवटपर्यंत प्रयत्न करायला नको का ?

धोंडी : बाये, पिकून झाडापासनं पडाया आल्यालं फळ तू पुन्ना थितंच डिकवाय पघती ? जा ! तिच्या शेजारीं बसा !

कोंडी : आर म्या विंजेक्शनं आनलींत भारीभारी–

धोंडी : कशाला पोरा ? तिनं देवाचिया दारीं येक पाऊल ठिवलं–आतां कशाला टोचाटोचीं ?

कोंडी : आर पर म्यां आनलींत !

धोंडी : दुदाच्या पैक्याचीं ? पान्याच्या पैक्याचीं ? तीं विंजेक्शनं तुपल्या व्हयनीला टोचाया निंगालास तू ?

कोंडी : आर दादा –

धोंडी : वरडूं नगस ! पाप हाये त्ये ! मी माज्या कारभारनीच्या अंगांत शेवटच्या घटकेला त्ये पाप टोचूं द्यायचा न्हाई ! ल्येकराबाळांना फसवून मिळावलेल्या पैक्याचीं विंजेक्शनं –

कोंडी : (*रडकुंडीला येऊन*) दादा र ! नग असा वैरी होऊंस !

धोंडी : (*त्याला जवळ घेत*) येड्या, मी वैरी हुईन ? तुजा ? तुज्या व्हयनीचा ? जलमभर जी गंगेपरमानं वाहात ऱ्हायली, तिच्या अंगांत मरतांना त्ये ईख टोचीतो ? जा, ती तुजी वाट पघती ! (*कोंडी धांवत आंत जातो.*)

जोशी : अवघड आहांत दादा तुम्ही !

धोंडी : मी तुंगीगडाचा हवालदार हाये जोशीबावा !

जोशी : सोन्यासारखा माणूस – या अहंकारानं वाया गेला !

धोंडी : जोशीबावा, शेशानं अहंकारानं फडा काडली, तिच्यावर धरती टिकून न्हायली ! (*सरू आंसवें गाळीत दारांत येते.*)

सरू : दादा, चला !

धोंडी : का ग बाये ?

सरू : गंगाजळ घालायला –

धोंडी : गप ! हवालदाराची सून रडत नसती ! जोशीबावा – चुप ! रडायचं न्हाई ! हवालदार घरान्यातली दिवली इझती, तिचं मरनबी हवालदाराच्या तोलामोलाल साजलं पायजे – (*धीरगंभीरपणें आंत जातो.*)

जोशी : कळायला कठिण आहे हा माणूस !

कोंडी : (*आंत हुंदकतो – "व्हयन्ये ! माज्या आये !" धांवत बाहेर येतो.*) दादा चण्डाळा ! त्वा माजी व्हयनी मारलीस – खून केलास मपल्या आईचा !...

पटाक्षेप

अंक तिसरा

प्रवेश पहिला

[संध्याकाळची वेळ. ओटीवरल्या भिंतीच्या कोनाड्यांत दिवली ठेवलेली आहे. धोंडी आंतून टेकर देत येतो. ओटीवरल्या खांबाला उकिडवा टेकून बसून तो चंची काढतो—आंतून सरू येऊन दाराशीं उभी राहाते. धोंडीची तंद्री लागलेली पाहून ती कांहीं क्षण न बोलतां उभी राहाते. धोंडी हाताशीं चंची तशीच धरून कोणीकडे तरी पाहात तसाच बसून राहातो.]

सरू : *(हळू स्वरांत)* दादा ! *(धोंडीचें लक्ष नाहीं, असें पाहून पुन्हा थोड्या जोरानें)* दादा !

धोंडी : *(चमकून)* आं ! मला म्हंगालीस काई ?

सरू : *(बाहेर येऊन खांबाशीं उभी राहाते)* दादा, कोणीकडे पाहात होतां ?

धोंडी : कुनीकडं न्हाई !

सरू : होय दादा ! तुम्हीं कोणीकडे तरी पाहात होतांत ! मला माहीत आहे तुम्हाला कोण दिसत होतं ते !

धोंडी : कोन दिसत हुतं ?

सरू : खरं सांगा दादा, तुम्हाला बाई दिसत होत्या कीं नाहीं ?

धोंडी : *(आग्रहपूर्वक)* न्हाई, न्हाई बाये ! मला कुनी सुदिक दिसत न्हवतं ! अन् ती कशाला दिसल मला ? तिची काईबी विच्छा ऱ्हायली न्हाई ! म्हपल्या मांडीवर तिचं मस्तक हुतं. तिचा कोंडी तिच्या त्वोंडांत गंगाजल घालीत होता. ढमाले घरान्याची कुळवंती तूं तिचा हात हातांत घ्येऊन बसली व्हतीस. बाये, ती भरल्या मनानं ग्येली ! ती कशाला कुनाला दिसल ?

सरू : मग दादा, तुम्ही पोटभर जेवत कां नाहींत ?

धोंडी : ज्येवतो कीं.

सरू : *(आग्रहपूर्वक)* मुळींच जेवत नाहींत ! आत्ता तुम्हाला भाजी वाढून जरा गोठ्यांत गेलें, तेवढ्यांत तुम्ही उठलांत !

धोंडी : न्हाई बाये ! आज लई ज्येवलो—पोट नुस्तं टम् फुगलं हाये ! अंबाडीची भाजी लई झकास झाली हुती !

सरू : छे दादा, मला असं फसवूं नका ! खूप प्रयत्न करतें बाईसारखा स्वयंपाक करायचा, पण जमत नाहीं !

धोंडी : *(प्रसन्नपणें हंसत)* माज्या आज्ये ! या ल्येकराचं तू लई करित्येस ! इकतं कुनी कुनाचं करीत न्हाई, पर बाये माज्या, आतां खान्यातला आनंद ग्येला ! वठल्या झाडाला पुन्ना काई कोंम फुटायचे न्हाईत ! आतां जगतोय्, त्यो धोंडी न्हाई, हवालदाराच्या येसाचा राखोळ्या !

सरू : तें कांहीं नाहीं दादा ! तुम्हाला मी सांगेन तसं वागलं पाहिजे !

धोंडी : वागतो कीं बाये !

सरू : मुळींच वागत नाहीं ! रोज रात्रीं झोपतांना मी तुमच्या उशाशीं दूध आणून ठेवते, तुम्ही पितो पितो असं म्हणतां. सकाळीं उठून पाहावं तर दूध जसंच्या तसं !

धोंडी : *(हंसून)* बाये माज्या, अभंग गुनगुनता गुनगुनता कवा झोप लागून जाती ते समजतबी न्हाई ! दीसभर श्येतांत कष्ट कराव लागत्यात, पटकन् प्येंग येती !

सरू : मग आत्तां आणून देतें—

धोंडी : नग बाये नग! येकदा खळ्याकडं चक्कर टाकून यायला हवा—किसना तिकड येकटा हाये! तू हितं ठिऊन ये! मी आल्यावर पितो कीं न्हाई पघ!

सरू : नाहीं प्यालांत तर?

धोंडी : तू सांगशील त्ये ऐकन!

[कोंडी येतो, रूक्षपणें धोंडीकडे न पाहातां ओटीकडे जातो. फेटा काढून ठेवतो. पुन्हां परतून ओट्यावर बसतो.]

सरू : जेवायला चलतायू ना?

कोंडी : *(रूक्ष स्वरांत)* मला न्हाई ज्येवायचं!

सरू : असं काय? मी पान वाढत्यें–

कोंडी : माझं टकूरं उटवू नगा–

धोंडी : *(मायेनें भिजलेल्या स्वरांत—)* आर जा मुला, सूनबाई तुज्यासाटीं कवाची थांबली–! दुदं काडन्याच्या अगुदर ज्येऊन घे!

कोंडी : तसला कोरडा लोभ कुनालाबी दावतां येतोय्!

धोंडी : का र बाबा? तुजं काय कमी झालं या घरांत?

कोंडी : समदं झालं! आतां नुसता जोग घ्यायाचा राहिलाय्!

धोंडी : *(जणूं बाण लागून)* असं का रं बोलितोस मुला–!

कोंडी : याहून सरळऽ माज्या त्वोंडातून निंगनाच झालंयू—

धोंडी : आर तुला पायजे तरी काय?

कोंडी : कशाला इच्यारतोस दादा? कव्हा सुख लागूं धिलंस तूं मला?

धोंडी : पोरा!

कोंडी : मी मराया बसलो, तव्हा त्वा म्हशी घेऊन धिल्यास! माजी व्हयनी नसती, तर त्याही धिल्या नसत्यास! त्या पैक्यांतला येक दमडा काई त्वा घरीं खर्चूं धिला न्हाईस! लगीन करून धिलंस, पर बायकूच्या अंगावर येक पैशाचा डाग त्वा करू धिला न्हाईस–म्हन, त्यो पापाचा पैका हुता! आन् श्येवटीं त्वां त्या पैक्याचं निमित्त सांगून माजी व्हयनी हातची दवडलीस! व्हयनी गेल्यापून माजं मन उदास झालं! आतां माजा मी सवतंतर न्हाईन! नग तुजा कार! तुजा मला नग, माजा तुला नग!

धोंडी : मुला, तुला म्हनायचं हाये काय !

कोंडी : मला–वाटनी पायिज्ये !

धोंडी : *(चमकून)* काय ?

कोंडी : मला–निम्मी वाटनी पायिज्ये !

धोंडी : *(संताप रोखलेल्या स्वरांत–)* कशाकशांतली ?

कोंडी : समयातली !

धोंडी : इयेतांतली ?

कोंडी ! व्हय् !

धोंडी : घरादाराची ?

कोंडी : तीबी पायजे !

धोंडी : हवालदारीच्या नजरान्यांतला हिस्सा ?

सरू : *(कुंठित होऊन)* अहो तुम्हाला झालंय् तरी काय ?

कोंडी : *(तिच्याकडे लक्ष न देतां)* त्योबी पायिज्ये !

धोंडी : गायरान ? मळा ?

कोंडी : त्येबी निम्मं निम्मं वाटून पायिज्ये–

सरू : अहो—

धोंडी : *(भडकून)* घेत न्हाई जा चंडाळा–घेत न्हाई !

कोंडी : *(चिडून)* कां घेत न्हाई ?

धोंडी : कां म्हनून इच्यारतोस ? आर कुलक्षेना ! कुठून दुर्बुद्दी आटवली तुला ही ? आर, आज इक्त्या पिढ्या नांदल्या हवालदाराच्या, कुनी क्येली हुती कां वाटनी ?

कोंडी : आजवर नसल क्येली ! पर—

धोंडी : आर गाडवा ! काल्चा पोर तूं ! मला शिकवाया चाललास ? कुनी भरवली र ही गोष्ट तुज्या मनात ? कुन्या चंडाळानं ह्ये ईख प्येरलं ?

कोंडी : कुनी का पेरिना ! माजा हिस्सा मला देऊन टाका !

धोंडी : न्हाई देत जा ! थू ऽ तुज्या जिन्यावर ! मर्दा–आर हवालदारांचं येस, मान, मर्तब– समयाचा पार इस्कोट कराया निंगालास कीं ? पवनपट्टा काय म्हनल ? थुकल त्वोंडावर का न्हाईल ?

कोंडी : काई का म्हनना पवनपद्य ! आन् वाडवडिलांचं येस कांहीं ज्येवाया घालीत न्हाई !

धोंडी : कोंड्या !

कोंडी : श्या द्यायचं कारान न्हाई ! तू हवालदार अश्शील, तर मीबी हवालदारच हाये— म्यां इच्यारलं वकिलाला, तुला निम्मा वाटा धिला पायजे !

धोंडी : हितवर पोचलास तू ?

कोंडी : आर हिंतं न्हाई येशील, तर कोरटांत येशील !

धोंडी : कुर्ट ?

कोंडी : कोरटांत ! तुप सरळ बोट घालून निंगत न्हाई ! त्या पायीं वाकडंच बोट करावं लागतंय् ! त्वां ह्यो रस्ता बंद क्येलास, तर त्यो रस्ता धरावा लागल मला !

धोंडी : (*उठून क्रोधानें थरथरत*) जा चालता हो ! त्वांड काळं कर ! पुन्ना ह्या घरांत दिसतां उपेगाचा न्हाईस तू — तुजा मुकवटा माज्या दिष्टीसमोर नको —

कोंडी : दादा, ह्ये लई हुतंय्—

धोंडी : जा कोरटांत ! जा — जा म्हन्तों ना ! (*कोंडी उठून तरातरा चालूं लागतो. सरू धोंडीजवळ येते. गहिवरून बोलूं लागते.*)

सरू : दादा —

धोंडी : (*भरलेल्या स्वरांत*) सरूबाये, कसं झाल ग ह्ये ?

सरू : तुम्ही शांत व्हा दादा—

धोंडी : शांत होऊ ? अग कसं शांत होऊ ? या गाडवाला कुन्या गोष्टीची कमी क्येली ? हाताचा पाळना करून वाडिवला याला — आंगाखांद्यावर खेळिवला — आन् चंडाळ आता म्हनितो, वाटनी करून द्या ! आर ह्ये समदं कुनाचं हाये ? कुनासाटीं इकते कष्ट करितो मी ? माज्यासाटीं ? आता काय न्हाइलं माजं ? ह्ये समदं तुजंच हाये म्हनावं ! आन् वाटनी कशाची ? घराची ? आर, चंडाळाला लाज कशी वाटली न्हाई ?

सरू : (*खाली बसून धोंडीच्या पायांना स्पर्श करीत*) पुरे झालं दादा ! त्यांना समजलं नाहीं तुमचं मोठेपण ! कुणाला ठाऊक—कधीं समजायचंही नाहीं तें—पण तुमचं मोठेपण असं उघड्यावर टाकूं नका दादा—तें महागामोलाचं आहे. त्याला कोणाची दृष्ट लागेल.

(धोंडी तिच्या मस्तकावर हात ठेवीत शेतांकडे निघूं लागतो.)

सरू : दादा—रागावलांत माझ्यावर ?

धोंडी : बाये, तुज्यावर राग धरील त्याचं कंदीबी भलं व्हायचं न्हाई !

सरू : तर मग इवला गूळ देत्यें तो खाऊन जावा—

धोंडी : आन आन !

(सरू आंतून गुळाचा खडा आणून धोंडीच्या हातावर देते.)

धोंडी : (*तो खडा तोंडांत टाकून*) झालं समाधान ?

[घोंगडी खांद्यावर टाकून धोंडी शेताकडे निघतो. सरू त्याच्याकडे बघत आसवें पुशीत आत जाते. थोड्या वेळानें भिम्या, नेन्या असे दोघे तिघे काठ्या हातीं घेऊन कोंडीला लोटीत येतात.]

भिम्या : आर तू येक हान ! मंग आमी पघतो !

कोंडी : न्हाई भिम्या—

भिम्या : त्ये काई न्हाई ? या हवालदाराला येकदां हिसका दावायला पायजे ! लईऽ मातला गडी !

नेन्या : तर काय ! पडक्या गडाचा हवालदार — पर अभिमान किती ? आमाला दूदइक्ये गवळी म्हून रोज श्या घालितो—

भिम्या : आरऽ ह्यो पडका गड—ही वसाड भिताडं पघाया जायलाबी त्येचो परवानकी पायजे म्हनं ! विना आडरचं कुनाला जाऊं देत न्हाई !

नेन्या : कुनीकून इकता माज आला कायनू ? आर ज्याच्या त्याच्यावर त्वांड टाकितो ! याच्यासंबूर कुनी बैलावर काठी टाकतां उपेगाची न्हाई ! म्हशीला तडाका हान्ता उपेगाचा न्हाई ! ! कुनी कुनावर डोळं काडतां उपेगाचं न्हाई ! ! याच्या या सासुरवासाचा ! कार लई झाला—

कोंडी : ह्ये म्हपल्या हातून व्हायचं न्हाई भिम्या !

भिम्या : (*कोंडीचा हात सोडून*) कोंड्या, तुजी जर विच्छा नसल तर आमाला काई इकता माज आल्येला न्हाई. पर ध्येनांत ठीव, आमी पुन्ना कंदीबी तुज्या मदतीला येनार न्हाई ! आर, आज घरांतून कुनी काडून लाविलं तुला ? कुनी हाकून दिलं ?

कोंडी : त्ये झालं–

भिम्या : तुझीन् किश्याची कुस्ती आठवती का न्हाई ? तू चित् झाल्यावर किश्याला कुनी धरून डोक्स्यावर उचिललं ? तुला इकता पैका मिळाला दुदांत–पर कुनी तुला वायकूला डाग कराया मना क्येलं ? कुनी तुला हज्जारदा 'दूद घ्या दूद' म्हनून चिडिवलं ? कुनी तुज्या बायकूला तुज्याविरुद फितिविलं ?

कोंडी : (*कानांवर हात ठेवीत*) पुरं झालं भिम्या !

भिम्या : अजून पुरं झालं न्हाई ! तुज्या व्हयनीचा खून कुनी क्येला ?

कोंडी : (*त्याचा हात दाबीत*) भिम्या –!

भिम्या : आर, तुजा दादा आत्ता ग्येला मळ्याकडं ! तू निस्ता म्होरं होऊन येक घाव घाल !

नेन्या : आपल्याला काई त्याला जिता मारायचा न्हाई ! निस्ता हिस्का दावला, का झालं ! चाल, हो म्होरं ! (*त्याला लोटीत नेतात. थोडया वेळानें गोजी सरूला हांका मारीत येते.*)

गोजी : सरूव्हयनी, अव सरूव्हयनी ! (*उदास सरू दारांत येऊन उभी राहाते.*)

सरू : काय ग गोज्ये !

गोजी : (*तिच्या उदास मुद्रेकडे पाहून*) का व ? बरं न्हाई का ?

सरू : बरं आहे की !

गोजी : मंग डोळऽ लाल का झाल ऽ ?

सरू : छे छे ! कुठं आहेत लाल ? (*ओटीवर बसून भाजी निवडूं लागते.*)

गोजी : मला फसवूं नका तुमी सरूव्हयनी ! तुमच ऽ डोळ अक्षी गुंजावानी लाल हैत !

सरू : अग, कांहीं झालं नाहीं मला !

गोजी : आत्तां झालं नसल, तर म्होरं हुईल काई तरी तापजाळ !

सरू : अग खरंच –

गोजी : तुम्हाला सांगत्यें मी सरूव्हयनी, सारजाकाकींनही आसलीच हूयगय केली दुखन्याची – म्हून म्होरं त्यें वाढलं !

सरू : (*एकदम गोजीचा हात धरून*) गोज्ये, आत्तां बाई असत्या तर –

गोजी : का व ? त्यांची सय झाली जनू ?

सरू : (*तिच्या खांद्यावर डोकें टेकीत भरल्या गळ्यानें*) त्यांनीं दिलेलं ओझं पेलवेना झालं ग !

गोजी : म्हंजी ?

सरू : म्हणजे ? म्हणजे कांहीं नाहीं —

गोजी : आज काई तरी झालंय् सरूव्हयनी —

सरू : अग कांहीं नाहीं —

गोजी : व्हय् ! तवाच तुमी रडत हुत्यात !

सरू : रडत होत्यें ? छे !

गोजी : तुमी लपवीता माज्यापासनं काय तरी –

सरू : नाहीं ग बाये ! अजून कांहीं तसं वाईट घडलं नाहीं – पण गोज्ये, तूं धांवत धांवत मला हांका कां घालीत आलीस ?

गोजी : व्हय् – त्ये न्हायलंच की सांगायचं ! अव आज वाघोबाच्या रावळांत तेल-वात घेऊन गेल्त्यें का, तवा दोगे तिगे हातांत काठ्या घिऊन कुनाकडं तरी जात होते. म्यां पुसलं कोन र ? तर माज्यावर डोळे काडीत म्हंगाले, तुला काय करायचंय् ?

सरू : असतील कुणी – गेले असतील कुठं–

गोजी : अव न्हाई ! मपलं ज्यावन झालं, आन् आय म्हंगाली, धाकल्याला बापाशीं नेऊन ठीव. म्हून मी त्याला घेऊन गनगा वान्याच्यादु कानांतं निघाल्यें का, तशी ते दोग धांवत धांवत असे हिकडून हिकडे ग्येलऽ ! मंग म्यां धाकल्याला बाजवळ ठिवलं, अन् हिकडं आल्यें लगोलग तुमाला सांगाया –

सरू : एकटीच ?

गोजी : एकटीच तर का झालं ?

सरू : गोज्ये, ऐक माझं ! रात्रींचं असं एकटीनं हिंडू नये !

गोजी : आपल्याला कोन खातंय् हितं आपल्या गांवांत ?

सरू : (*एक उसासा सोडून*) तुला ठाऊक नाहीं गोज्ये ! माणसाची बुद्धि पालटत चालली –

गोजी : का झालं व ?

सरू : हीं अशीं माणसं काठ्या घेऊन हिंडायला लागलीं ! आपण तरण्याताठ्या मुलीनं असं एकटं इतक्या लांब येऊं नये !

गोजी : आन् तुमी हितं इक्त्या लांब रानांत राहातां त्या ?

सरू : मी हवालदारीण आहें गोज्ये ! मला कुणी खात नाहीं !

गोजी : मंग मीबी हवालदार दादांची मानल्येली ल्येक हाये—मला कुनी ढक्का लावील, तर त्याला कापून खात्याल दादा ! त्यांचा धाकच हाये तसला ! त्ये हितं असल्यावर कुनी कुनाच्या अंगाला हात लावायचं न्हाई — (*कपाळावर रक्त साकळलेला धोंडी झोक सांभाळीत येतो. त्याला पाहातांच सरू आणि गोजी आश्चर्यानें त्याच्याजवळ जातात*)

सरू : काय झालं दादा ?

धोंडी : (*कृत्रिमपणें हंसत*) कुटं काय ? काई न्हाई !

सरू : रक्त कसलं ? कुठं लागलं ? कसं—

धोंडी : आग काई न्हाई बाये – अंदाराचा येत हुतों — बाभळीचं बुडुख दिसलं न्हाई–वाईच लागला धसका —

सरू : (*ती जखम दाबीत*) गोज्ये, पळ ! आंतून डबींतला काथ अन् एक फडकं आण–(*गोजी आंत पळते.*)

धोंडी : वाईच पानी आन बाये !

सरू : ऊं हूं ! पाणी लागलं जखमेला तर जखम चिघळेल ! दादा, तुम्ही आंत चला ना !

धोंडी : नग बाये ! वाईच हितंच बसतों –

सरू : पण असं कसं लागलं ?

धोंडी : (*हंसून*) आतां का कराचं त्याला ? आपला भोग म्हनायचा नी काय न्हाई दिसलं, लागलं ! कुनाकडं तरी ध्यान हुतं, न्हाई उमगलं !

सरू : दादा, आतां रात्रींचं असं बाहेर जात जाऊं नका !

धोंडी : (*हंसून*) शेतकरी मानूस बाये मी ! न जाऊन कसं भागल ?

सरू : (*भरून येऊन*) तुमचं मन कुठं तरी गुंतलेलं असतं. अपघातीं कांहीं तरी घडलं म्हणजे ? मला भीति वाटते–

धोंडी : काय देव करील त्ये खरं ! [गोजी आंतून धावत येते]

गोजी : व्हयम्ये, ह्यो काथ–आन् ह्यै फडकं !

सरू : अग एवढंसं फडकं कसं पुरेल ? हें बघ–दांडीवर माझं पांढरं पातळ आहे– तें फाडून एक लांब पट्टी आण–

गोजी : त्यै तर नवं हाये जनू ?

धोंडी : नवं लुगडं कशाला फाडीत्ये सरूबाय ? कोंडी रागावला म्हंजी ?

सरू : (*अभिमानानें*) तें माझ्या माहेरचं आहे !

धोंडी इक्ता अभिमान करूं न्हाई बाये–

सरू : दादा, तुम्हाला तर सगळं माहीतच आहे–

धोंडी : बाये, चलतीस का ?

सरू : कुठं दादा ?

धोंडी : जाऊं कुटंबी मायल्येकरं–आळंदी पंडरीला !

सरू : (*आश्चर्यानें*) दादा– !

धोंडी : आतां वझं वाटाया लागलं बाये !

सरू : दादा, जरा अंगरख्याच्या गुंड्या काढता का ? मानेवर रक्ताचे ओघळ आहेत, ते पुसून घेतें !

धोंडी : काइं ? (*सदरा काढीत असतां वेदना तोंडावर उमटतात*)

सरू : कां दादा ? इथंही लागलंय् कीं काय ?

धोंडी : न्हाई न्हाई !

सरू : नाहीं कसं ? बघू ? (*पाठीचा भाग चिमणी घेऊन बघते. स्तंभित होते. क्षुब्ध स्वरांत बोलूं लागते.*) दादा, मला फसवूं नका ! कुणीं मारलं तुम्हांला ?

धोंडी (*आवाज चोरीत*) बाये न्हाई मारलं कुनी ? बोलूं नगस मोठ्यानी कुनी आइकल–ए गोजाबाई, जा, घरीं जा ! जा म्हनीतों ना !

सरू : (*डोळे पुशीत कणकणीत स्वरांत*) नाहीं दादा ! मी तुम्हाला त्या मारणारांवर असं पांघरूण घालूं देणार नाहीं ! तुम्हाला त्यांचीं नांवं सांगितलीं पाहिजेत !

धोंडी : म्हंजी काय हुईल ?

सरू : काय होईल ? त्यांना कळेल, कीं त्यांनीं कुणाला मारलं आहे–

धोंडी : आईक पोरी–

सरू : नाहीं दादा–त्यांच्या हातांत बेड्या पाहिल्याशिवाय मला बरं वाटायचं नाहीं !

धोंडी : कुनाकुनाच्या हातांत बेड्या पघशील पोरी ?

सरू : म्हणजे काय दादा ?

धोंडी : नग नग ! आपल्या कुळांत कुनी कोरटांत ग्येलं न्हाई !

सरू : तुम्ही सांगत नसाल, तर मग मला उद्यां ठाण्यावर जाऊन वर्दी द्यावी लागेल दादा !

धोंडी : बायो ! इत्कं गरम कुनी होत आमनं का सरूबाये ? जीभ दातांखालीं घावली, त कुनी दात पाडाया निघत का ?

सरू : (*अवसान गळून थरथरत*) माझी शपथ आहे तुम्हाला—त्या मारणारां-बरोबर—

धोंडी : काय इच्यारतीस ?

सरू : हे–हे होतं !

धोंडी : (*अत्यंत स्नेहानें*) गप बाये गप !

(*सरू एकदम खाली कोसळते. धोंडीच्या पाठीवर डोकें टेकून रडूं लागते. धोंडी तिच्या पाठिवर हात फिरवीत बोलतो.*)

धोंडी : गप ! रडूं न्हाई येच्यावानी !

सरू : दादा, माझं एक ऐकाल ?

धोंडी : सांग बाये !

सरू : आतांपर्यंत तुमच्याजवळ कांहीं हट्ट केला नाहीं–आतां करत्यें !

धोंडी : सांगा —

सरू : पण अगोदर हो म्हणा !

धोंडी : हो बाये हो ! सांग आतां —

सरू : यांना–यांना क्षमा करा !

धोंडी : बाये, ती तर आदुगरच क्येली—

सरू : ते माझे पती आहेत, म्हणून नाहीं मागत हें मागणं—

धोंडी : मंग कशापाई ?

सरू : बाईनीं सांगितलंय् – शेवटल्या दिवशीं – त्यांना पश्चात्तापानं जळू दे ! उजळून निघू दे ! हवालदार घराण्याला शोभतील असे होऊं दे ! त्यांच्या कुळाचं थोरपण त्यांना कळू दे – तें शिक्षा करण्यांत नाहीं – क्षमा करण्यांत आहे ! त्यांनाही कधीं-तरी कळेल कीं—

धोंडी : बोल बाये—

सरू : कळेल, कीं आपल्या दादाचं मन डोंगराएवढं होतं ! चला उठा दादा ! दूध पिऊन झोंपवल्ये तुम्हाला !

धोंडी : माये ! किती करशील ल्येकराचं ?

सरू : चला ! [*धोंडीला धरून दोघी आंत जाऊं लागतात–तोंच धोंडीदा ! अशी हांक येते.*] गोज्ये, बघ बाई कोण आहे तें – त्याला म्हणावं, सकाळीं भेटतील दादा आतां कोणालाही आंत सोडूं नकोस ! (*जातात.*)

गोजी : कोन हाये ?

सोनबा : (*येऊन*) धोंडीदा कुटं ग्येलऽ ?

गोजी : ते झोपलेत—

सोनबा : आर ! त्यान्ला कुठं लागलं जनू ? कुनी म्हनीत हुतं ?

गोजी : व्हय् – न्हाई – म्हंजी काई लई लागलं न्हाई – ते झोपलेत – उंद्या भ्येटतील–

सोनबा : पर तुजी इत्की गडबड का झाली ?

गोजी : कुटं झाली गडबड ?

सोनबा : गडबड न्हाई तर काय ! व्हय् – लागलं–न्हाई–लागलं न्हाई – (*जोशी गडबडीनें येतो.*)

जोशी : होय गोज्ये, दादा कुठं आहेत ?

गोजी : त्यांना पार झोप लागली – घोराया सुदीक लागलं ऽ आसतील !

जोशी : त्यांना लागलं म्हणे ? (*आंत जाऊं लागतो.*)

गोजी : जोशीकाका, आंत जाऊं नका !

जोशी : (*आश्चर्यानें*) का ग ?

गोजी : सरूव्हयनीनं सांगितलं—

जोशी : काय सांगितलं ?

गोजी : सांगितलं, का दादांना गाढ झोप लागली, आता उंद्या सकाळपात्तुर त्ये काई उटायचे न्हाईत–तवा कुनाला आंत सोडूं नको–काय लई लागलं न्हाई –

जोशी : आश्चर्य आहे – (*गनशा वाणी येतो.*)

गनशा : दादा हैत कुटं ? त्यानूला लागला बोलत्यात ? किती लागला ?

जोशी : गनशा, बातमी अशी आहे–कीं दादांना पार झोंप लागली, घोरायलासुद्धां लागले असतील, त्यांना गाढ झोंप लागली, उद्यां सकाळपर्यंत कांहीं ते उठायचें नाहींत–आंत कुणीं यायचं नाहीं–त्यांना फार लागलं नाहीं – (*गोजीकडे वळून*) येडपट कुटली ! चल हो बाजूला !

गोजी : जोशीकाका, थांबा, मी सरूव्हयनीला बोलावीत्ये –

जोशी : जा बोलाव ! (*गोजी धावत आंत जाते*) आज हें नवलच घडतंय् !

सोनबा : आतां पघा मंजी झालं ! हवालदाराचं दार कंदीबी आसं बंद झालेलं आपुन पाहिलं न्हाई ! [गोजी आणि सरू येतात.]

जोशी : सरू, झालं आहे तरी काय ?

सरू : (*आवंढा गिळून*) कांहीं नाहीं !

जोशी : हवालदारांना लागलं नाहीं ?

सरू : पण तें काळजी करण्याजोगं नाहीं—

जोशी : त्यांना झोंप लागली आहे ?

सरू : (*करुण दृष्टीनें त्याच्याकडे पाहात*) तुम्ही सगळे उद्यां सकाळीं याल का ? मला उमज पडायला जरासा वेळ द्या !

जोशी : सरू – !

सरू : पायां पडतें जोशीकाका !

जोशी : चला बाबांनो ! चला ! उद्यां सकाळीं येऊं ! (*सगळे जातात.*)

सरू : (*गोजीच्या गळ्यांत पडून*) गोज्ये –

गोजी : व्हयन्ये !

सरू : कसं झालं ग हें ! [स्फुंदूं लागते. गोजी तिला थोपटूं लागते, तों दुसऱ्या बाजूनें कानोसा घेत बावरलेला कोंडी येतो. त्याला पाहातांच सरू एकदम ताठ होते.]

कोंडी : (*अस्फुट स्वरांत*) दादा –

सरू : (*ताठरपणें*) त्यांना झोंप लागली आहे !

कोंडी : झोंप –

सरू : हो ! गंगाजळासारखं मन असलेल्या माणसाला पटकन् झोंप लागते –

कोंडी : त्याला...त्याला लागलं किती ?

सरू : तुम्हांला तुमच्या घावांचा अंदाज नाहीं ? तुमच्या काठीच्या एका रद्दयानं तयार बैल खालीं नाकतो –

कोंडी : (*विव्हल स्वरांत*) म्यां न्हाई म्हटलं – पर – भिम्यानं माज्या हातीं काठी धिली – पर मला वाटलं, दादा पोलिसांत ग्येला असल !

सरू : दादा ?

कोंडी : (*तोंडांत मारून घेत*) आतां काय करूं ? लई वाईट काम घडलं मपल्या हातून ! (*गोजी कावरीबावरी होऊन निघून जाते.*) लई वाईट काम घडलं !

सरू : (*कोंडीजवळ येऊन त्याच्याकडे रोखून पाहात*) कुणाला मारलंत तुम्हीं ? दादांना ? त्याच्या आधीं कुऱ्हाडीनं माझे तुकडे कां केले नाहीं ?

कोंडी : सरू —

सरू : बाईंनीं मला जाण्याच्या आदल्या दिवशीं सांगितलं होतं, किती झालं तरी तुम्हीही या घराण्याचे पुत्र आहांत ! वाकडं वागणं व्हायचं नाहीं तुमच्या हातून – पण तुम्हीं – हें अक्रीत केलंत तुम्हीं ! बाईंच्या आत्म्याला काय वाटेल ? त्यांना धन्य धन्य होईल –

कोंडी : (*धांवत दाराकडे जात*) दादा ! दादा र !

सरू : कशाला तोंड दाखवतां त्यांना ?

[तोंच आंतून धोंडी येतो. कोंडी त्याच्या पायीं लोळण घेऊं जातो, तों धोंडी त्याला उचलतो. मिठी घालतो.]

धोंडी : सूनबाये, नग वाभाडे काढूं माज्या पोराचे ! आइकलं का कोंडीनाना ! उंद्या वडगांवाला जायाचं –

कोंडी : न्हाई –

धोंडी : पोरा, तुला काई उमगत न्हाई !

कोंडी : न्हाई दादा –

धोंडी : आर पोरा ! लई दी म्यां भोगली हवालदारी ! आज, उंद्या, परवा कवातरी ह्ये, तुलाच पघावं लागणार ! मी हाये तंवरच ह्यो भार उचला. निसतं नांव तुजं घाली– तों–तुला म्होरची काळजी नग ! माजी सूनबाई पघल समदं समदं हुतं तसंच चालल–मी पुर्वीपरमानंच म्हेनत करीन. निसतं धन्याचं नांव बदलनार ! माजं हुतं, तितं तुजं व्हानार !

सरू : दादा– !

धोंडी : आपला सबूद इसरलीस पोरी ? ह्यो समदा भार त्वा उचेलला हुतास !

सरू : एक शर्त दादा !

धोंडी : कंची ?

सरू : ह्यांना सांगा– यांतलं एक अक्षर बाहेर फुटलं, तर–

धोंडी : तर काय ?

सरू : मी या वीराजवळ झाडाला फांस घेऊन जीव देईन !

धोंडी : येडी ! चला, मालकांना ज्यावाया वाहाडा !

सरू : (*दाराशी थबकून*) आणीक एक दादा !

धोंडी : आतां काय व्हायलं ?

सरू : टिटवी धांवत्येय् समुद्र उपसायला – पण मीं हें न केलं, तर बाईंच्या आत्म्याला —

धोंडी : आमाला काई उमागलं न्हाई !

सरू : तुमचा भार तुम्ही माझ्यावर सोंपवा ! माझ्या सांगीबाहेर जाणार नाहीं, असं म्हणा !

धोंडी : आर इच्या मारी !

सरू : म्हणा दादा !

धोंडी : बर बाये बर ! आईकत जाईन तुज ! चला आता ! कोंडीला भूक लागली आसल —

अंक ❋ तिसरा

[किसना घाबऱ्या घाबऱ्या धांवत येतो.]

किसना : दादा—

धोंडी : का र?

किसना : माजा गोऱ्हा—

धोंडी : त्याला का झालं?

किसना : अव डोळं तांबडं लाल झालं! ऱ्यानाबरूबर काळं वंगाळ रगात भाएर आलं! आन् शिंग उडिवतोय्!

धोंडी : आर फाशी झाली का काय? चल चल!

सरू : दादा—जेऊन तरी—

धोंडी : न्हाई बाये! गावावरलं संकट हाये—चला कोंडीनाना!

(सरू त्यांच्याकडे पाहात राहाते, आणि मग हताश होऊन आंत जाते.)

. . . . प्रवेश दुसरा . . . .

[मार्गानें केरबा चालला असतां त्याला थकून आलेला सोनबा भेटतो.]

केरबा : सोनबा, झालं का काम ?

सोनबा : काई न्हाई झालं केरूदा! तुजं तर झालंच आसल ?

केरबा : व्हयू गड्या! पोरानं मुंबैहून धाडला काई पैका? काई धाडला आमच्या जावयानं काश्मीरांतून—

सोनबा : दाभाड्यानं ? पलटणीतून ?

केरबा : व्हयू! त्यांनं लिवलं, लगीन न्हाई झालं म्हून का झालं? मी तुमचा

जावईच हाये – उंद्या तुमची मुलगी माजी बायकू म्हून नांदायची – तवा ह्या काहारांत न्हाई म्हनूं नका ! योक बईल मपल्या पैशांतून घ्या !

सोनबा : लई वाईट झालं केरबा ! समद्या पवनपट्टयांत येक बैलांची जोडी काई न्हायली न्हाई ! पटापटा चार दिवसांत जनावरं उडालीं !

केरबा : आर, त्या रोगाचं नांवच फाशी हाये ! फाशी धिल्यावानी जनावरं मरत्यात !

सोनबा : हवालदारांची तर एक म्हतारा गर्जेन बैल सोडून समदी दावनच खपली ?

केरबा : व्हय् ! म्हशी तिक्त्या कोंडीनं लोनावळ्याला पळिवल्या म्हून वाचल्या !

सोनबा : मरनाचं आसं आसतं बाबा ! त्ये हवालदारबी वळखीत न्हाई, आन् येसकरबी म्हनीत न्हाई !

केरबा : मंग तुज्या इर्जिकीचं कसं कसं ?

सोनबा : आता तुमी गावकरी कराल तसं तसं ! एखाद्या दिवशीं समदीं आउतं मपल्या शेतांत येऊंद्या ! येका दिसांत समदं शेत उकलून टाका. सांजच्या पारीं गुळवनी पोळी जेवा, का झालं !

केरबा : करूं करूं ! काई तुजं ह्यात पडूं द्येनार न्हाई !

सोनबा : आन् हवालदारांचं र ?

केरबा : त्यांचं काई उमगना झालं मपल्याला ! म्यां गोष्ट काढली त्यांच्यापाशीं इर्जिकीची—

सोनबा : मंग काय म्हंगालऽ ?

केरबा : यवढालऽ डोळ ऽ काहाडलऽ माज्यावर ! म्हंगालऽ का तुंगीगडाच्या हवालदाराच्या ह्यातांत इर्जीक यायची न्हाई !

सोनबा : मंग म्हेनतीचं कसकसं ?

केरबा : म्यां भीत भीत इच्यारलं–तवा म्हंत्यात, माज हातपाय काई मोडल ऽ न्हाई आजून ! इर्जीक घालनं म्हंजी काई मानाची गोष्ट न्हाई – मी मपल्या ह्यातांत इर्जीक घालूं द्येनार न्हाई ! *(कडें वाजूं लागतें)* आर ! कडं कुनीकडं वाजतंय् ? [कोंडी येतो.]

कोंडी : केरदादा ! दादाला वाईच सांगा की !

केरबा : काय सांगूं ? बाबा तुजा दादा लई उच्च जागीं बसला हाये–तितपस्तुर आपला सबूद काई गोचत न्हाई !

कोंडी : पर ह्या आकृति म्हेनतीला काय म्हनावं ?

केरबा : काय झालं ?

कोंडी : अव, सवता कुदळी घ्येऊन श्येत खंदाया लागला हाये ! थितं वाजतंयू कडं ! मांग कडं वाजिवतोयू, दादा श्यात खनीतोयू !

केरबा : धा एकर ? समदंच्या समदं ?

कोंडी : व्हयू ! म्हनीतो, का काम न्हाई क्येलं, तर धाकलऽ मालक रागावतील !

केरबा : आचीर आचीर ! हवालदाराचं समदंच आचीर !

कोंडी : मपली कारभारीन म्हंगाली,: का दादा, ह्ये कष्ट करूं नगा ! तवा म्हंतो कसा, का बाये, शेतकऱ्याला कष्टाचं कवतिक न्हाई ! ती दादाचा घाम पुसाया ग्येली, तर तिला एक्या अंगाला सारून म्हंगाला, कां जिमिनींत आसुदाचे पाट वाहवले माज्या बापदायानं ! तिक्तं तर काई घडत न्हाई ! तर घाम तरी व्हाऊं द्ये !

केरबा : आत्तां काय सांगावं या हवालदाराला !

कोंडी : केरबा, यावर काई उपाय न्हाई का ?

केरबा : आर न्हाई कसा मर्दा ! तू निसतं सांग–येका घटकंत समदा गांव जमून धा एकर नांगरून टाकीतों ! पर दादाचं तिकतं पघ म्हंजी झालं !

कोंडी : धाकली हवालदारीन म्हंगाली, मी सांगत्यें दादांना ! तुमी आना इर्जीक !

केरबा : पघ बरं ! दादा डोक्शांत राख घालील !

कोंडी : न्हाई घालायचा. त्याचा धाकल्या हवालदारनीवर लई भाव हाये. ती त्याला समजावील !

सोनबा : मंग काय र गड्या केरबा ?

केरबा : उंद्या आनीतों इर्जीक धा येकरांत !

कोंडी : ठरलं ?

केरबा : व्हयू ! तू सताठजनांना माजा निरूप सांग म्हंजी झालं–भुजाबा माळी, रानबा म्हांकाळे—

कोंडी : सांगतों— *(जातात.)*

. . . . प्र
वे
श
तिसरा . . . .

[घामानें थबथबलेला धोंडी खांद्यावर कुदळ घेऊन शेताकडून येतो. प्रसन्न मनानें हांक घालतो.]

धोंडी : सरूबाय ! अव सरूबाय !

सरू : *(पिठानें भरलेले हात घेऊन आंतून येत)* मला हांक मारलीत दादा ?

धोंडी : व्हय् ! काय करीत हुतां ?

सरू : स्वयंपाक करीत होत्यें --

धोंडी : करा करा ! पघा सूनबाई, येकरभर जमीन खंदून झाली !

सरू : *(व्यथेनें)* दादा, तुम्ही तर कांहीं ऐकत नाहीं.

धोंडी : आइकतों कीं ! सांगा ! अव तुमचं न्हाई आईकल्यावर मंग कसं ? हवालदाराघरच्या मालकीनबाई तुमी !

सरू : मी म्हणत होत्यें इर्जिकीचं --

धोंडी : न्हाई.

सरू : नुसतं नाहीं म्हणून कसं भागेल दादा ?

धोंडी : बाये, एका सबुदानंच भागतंय् ! त्यों हवालदाराचा सबुद हाये. उगा धाईस सबुदांची पलटन उबी करायची काई जरूर न्हाई !

सरू : पण दादा—

धोंडी : (*आग्रहपूर्वक*) बाये, हवालदाराच्या बान्याला आसं भीक मागनं सोबत न्हाई !

सरू : कां शोभत न्हाई ? दादा, जगरहाटीप्रमाणें चालायला नको ?

धोंडी : आत्ता ! तूबी आसं म्हनाया लागलीस म्हंजी भागलंच की ! बाये, इजींक सांगनं म्हंजी घरोघरीं जोगवा मागन्यापरमानं हाये. आजपत्तुर हवालदाराच्या घरान्यांत आसं कुणीं केलं न्हाई ! धा येकरांत दुसऱ्या कुनाचं आऊत गिरलं न्हाई आजून !

सरू : पण अगदीं प्राणावर येऊन बेतलं तरी ?

धोंडी : कुनाच्या ? कुनाच्या गळ्यावर फसाची दोरी पडली बाये ?

सरू : मी तुमचं म्हणत होत्यें—

धोंडी : *(आश्चर्यानें)* माजं ? मला का धाड भरली ? *(हंसून)* चांगला खातों, पितों, तमाखु खातों, रातीं निसूर झोप लागती—मला कां झालं ?

सरू : दादा, मला हें तुमचं ढोरासारखं खपणं पाहावतं नाहीं—

धोंडी : बाये, हवालदाराच्या कुळानं आपला मान असाच सांभाळाया हवा !

सरू : देहाची माती करून ?

धोंडी : पोरी माज्या ! जुनी कंथा इसरलीस जनू ? एक ढमाल या धा येकरांत रक्तानं न्हाऊन झोंपला ! एक पळसासारखा आसुदानं भरला ! तवा मिळाली हवालदारी !

सरू : पण म्हणून प्रत्येकानं असे प्राण तळहातावरच धरायला हवेत का ?

धोंडी : बाये, तू न्हान हायेस अजून ! तुला उमगत न्हाई ! अग, एका धोंडीच्या ध्येईची काय कथा ! धोंडीसाटीं हवालदारी न्हाई बाये, हवालदारीच येस राखन्यासाटीं धोंडी हाये ! तवा माजी काळजी नगस करूं ! हवालदारीचा मान राखन्यापायी धोंडी खपला तरी चालल—

सरू : दादा—!

धोंडी : व्हय् पोरी ! ह्यो आपल्या घरान्याचा बाना हाये ! इकतं ध्येनांत असूं द्ये घरान्याच्या येसाफुडं मानसाची मातब्बरी न्हाई—

सरू : पण आम्हाला तुमचे कष्ट बघवत नाहींत—

धोंडी : मंग चार दिवस म्हायेरीं जा—

सरू : काय सांगतां दादा !

धोंडी : *(हंसून)* आतां कसं सांगूं बाये ! मरनाला मिठी घालाया मानसं घरांतून

निगायचीं, आन् त्यांच्या बायका त्यांना हंसत हंसत ववाळायच्या – त्या घरान्यांतली तू सून – आतां तुला मानसाचे कष्ट पचवना झाले, म्हंजी भागलंचं कीं !

सरू : हें सगळं कळायला कठिण आहे दादा !

धोंडी : मंग इक्तं सोप आसत, असं कुनीं सांगितले तुला ? हवालदाराची सून होन इक्ती सहज गोष्ट न्हाई बाये – तवा ध्येनांत आलं का ?

सरू : पण दादा, हवालदार घराण्यांतल्या माणसानं एखादा शब्द दिला, तर त्यानं तो पाळायला पाहिजे नाहीं ?

धोंडी : अलबत ! काय वाटेल त्ये झालं तरी–

सरू : तर मग तुम्हीं मला शब्द दिला आहे, कीं माझ्या सांगीबाहेर जाणार नाहीं– अन् ––

धोंडी : आतनी काय ?

सरू : मी यांना शब्द दिला आहे–

धोंडी : काय ?

सरू : सांगितलं, कीं दादांना मी समजावीन–

धोंडी : आनी ?

सरू : मला दादांचं शेतांत खपणं आतां सहन करवत नाहीं, तुम्ही इर्जीक सांगा !

धोंडी : *(क्षुब्ध होऊन)* पोरी !

सरू : होय दादा ! हे आलेच पहा– (कोंडी येतो) सांगितलंत सगळ्यांना ?

कोंडी : व्हय ! समदंऽ झालंच म्हना की !

सरू : केव्हाचं सांगितलंत ?

कोंडी : आतां घटकाभऱ्यानं समद्यांचीं आउतं धा एकरांत येत्याल !

धोंडी : *(उठून कोंडी जवळ येत विकृत स्वरांत)* त्वां इर्जीक सांगितलीस जनू !

कोंडी : व्हय त्यांनीं सांगितलं हुतं–

धोंडी : *(भडकून)* आर, त्या परीस माज्या टकुऱ्यांत कुराड का न्हाई घातलीस ? आं ?

कोंडी : आइक दादा–

धोंडी : कुलक्षेना ! पुन्ना मलाच आइक म्हनीतो ! समदा पवनपट्टा ज्याचा सबूद कौलावानी मानीतो, त्याचा सबूद त्वा इर्जीक सांगन्यापाई खरच क्येलास ?

कोंडी : पर दादा–

धोंडी : दादा म्येला तुजा ? कष्ट करीत हुतो का न्हाई ? ढोरावानी तुज्या श्यातांत खपत हुतो का न्हाई ? कपाळापासून पायापत्तूर घामानं न्हात हुतो का न्हाई ? काय कमी पडलं म्हून त्वां ह्यो भिकेचा कटोरा उचेललास ?

कोंडी : पर गाव म्हंगाला–

धोंडी : आर मस म्हंगाला गाव ! गाव उंद्या म्हनल, आमच्या घरून सनासुदीचीं वाढनं घेऊन येत जा ! आनाल का ? आर कोन तुमी ? काय तुमच्या बापदाद्यांची कीरती ! काय त्यांचं धाडस ! काय त्यांचा बाना ! आन् कुनाच्या श्यातांत सांगितलीस इर्जीक ?

कोंडी : तुमच्या दादा !

धोंडी : आर मी कोन ? हवालदारांच्या पायांतलं खेटर मी ! माज्या श्येतांत न्हाई सांगितलीस इर्जीक. तुंगीगडाच्या हवालदाराच्या श्यातांत राबन्यासाटीं त्वा जोगवा मागितलास ! आरारारा ! थू तुज्या जिनगानीवर ! *(कुदळ उचलून शेताकडे जाऊं लागतो – जातांना एकदम माग फिरून खुंटीवरचा आसूड खांद्यावर घेतो. तोंच केरबा आणि सोनबा येतात.)*

धोंडी : या ! आउतं कुटं हायेत ?

केरबा : येत्यात !

धोंडी : आन् फरशी कुराड ?

केरबा : ती कशापाई ?

धोंडी : माजऽ तुकडऽ कराया ?

केरबा : दादा ––

धोंडी : आर बुद्दी ग्येली कुटं तुमची ? कुन्या वान्याकडं घान टाकलीत ? आमच्या गाडवानं इर्जीक सांगितल्याबरुबर तुमी त्वांड भरून हा म्हंगालात ? मी काय म्हनल याचा इच्यार क्येलाच न्हाई ? (जोशी येतो.) या जोशीबावा ! पंचांगन कुटं टाकलंत ?

जोशी : हें कशाला ?

धोंडी : माजी समादी बांदायचा मुहुर्त पघायला !

जोशी : दादा —

प्रवेश ❀ तिसरा

धोंडी : काई बोलू नका जोशीबावा ! तुमीं समर्थांनीं माज्या इरूद्द कट क्येला —

जोशी : हें काय बोलतां दादा ? आम्ही हें सगळं तुमच्या भल्यासाठीं करतों आहोंत —

धोंडी : तुमचीबी बुद्दी फिरली जोशीबावा ? माजं भलं काय ह्ये तुमालाबी उमगना झालं ? अव हवालदार घरान्याच्या बिरदाला धक्का लागतां उपेगाचा न्हाई – यांतच माजं भलं हाये —

जोशी : पण गांवाचं खरं, कीं रावाचं ?

धोंडी : जोशीबावा, मी अडानी मानूस ! तुमच्यावानी लई बोलता येत न्हाई मला ! बाईसायेबांनीं आवतन धिलं, आउतं येनारच गांवकीचीं ! येऊं द्या ! मी जातो धा येकरांत !

जोशी : कशाला ?

धोंडी : त्ये थितं आल्यावर उमगल ! गावा रावाचीच गोष्ट काडली तुमी ! गावाला दिसल, का हवालदारबी काई कमी पडला न्हाई ! त्यानं आपला सबूद खरा क्येला ! *(जातो.)*

सरू : दादा – !

कोंडी : तुमी आइका ! नगा धावूं त्याच्या मागं ! त्यो न्हाई आइकायचा ! त्यान कदींच कुनाचं आइकलं न्हाई !

सरू : आकाशाएवढं मन आहे दादांचं ! कुणाला उंची कळायची नाहीं त्याची !

कोंडी : व्हय् ! पर आमी न्हान हाओंत, त्याची काय वाट ? आमी काय वागूच न्हाई जगांत ? का केरबा ?

केरबा : बरूबर हाये ! मंग कार्य्येक्रम कसा कसा ?

कोंडी : यांना इच्यारा की !

केरबा : बोला सरूबाई –

सरू : मला कांहींच सुचेना झालं आहे –

केरबा : बाये, तू इत्की ग्यानी सुरती – त्वां असं म्हतलंस, म्हजी सपलंच की !

सरू : दादांचं मघांचं बोलणं ऐकायला तुम्ही हवे होतांत –

केरबा : मस आईकलं ! आइकतां आइकतां म्हातारा व्हायाला आलों. आपुन ठरिवलंयू. दादाचं वागनं आन् बोलनं आपल्याला काई उमगत न्हाई. तवा त्याला नमस्कार करायचा, आन् आपल्याला वागायचं आसल तसं वागायचं !

कोंडी : जोशीकाका, मुहूर्त पघा –

जोशी : अरे उत्तम मुहूर्त आहे–आज बुधवारचा दिवस आहे, आश्विनी नक्षत्र आहे. घाला नांगर शेतांत !

सरू : पण जोशीकाका, दादांचं –

जोशी : तूं काळजी करूं नकोस सरू ! अन् आपण हें सगळं त्यांच्याच साठीं करतोंयू ना ?

सरू : हो –

जोशी : त्यांनीं शरिराची माती करून घेऊं नये, म्हणूनच आपण इर्जीक सांगितली ना ?

सरू : हो –

जोशी : तर मग कांहीं काळजी करूं नका ! चालं द्या धूमधडाका ! घाला नांगर शेतांत !

केरबा : आईक सोनबा ! बईलाचं जुळलं का तुझं ?

सोनबा : जुळलं कीं !

केरबा : मंग एक आऊत तुझं, एक माझं, रानबा म्हांकाळा, एक भुजाबा माळी एक–

[भिम्या अन् नेन्या येतात.]

भिक्या : कसली मोजनी चालली बोटं मोजून ?

केरबा : आउतांची – तू न्हाई येनार जनू भिम्या ? तुला दुद घालाया जायचं आसल ?

भिम्या : म्हशी खपल्या या रोगांत ! दुदबीद काई ऱ्हायल्या न्हाईत-मीबी येनार की !

केरबा : आसुं द्ये–

भिम्या : मंग आपुन येनार !

[गोजी शेतांकडून धांवत येते.]

गोजी : *(धापा टाकीत)* अव सरूव्हयनी – अव सरूव्हयनी–

सरू : काय झालं ग गोज्ये ?

गोजी : अव धा एकरांत दादा–सवता नांगराला जुपून घ्येतलंय–एका बाजूला गर्जेना बईला, दुसऱ्या बाजूला आपुन–

सरू : दादा ! *(तिकडे पळते–तिच्या मागोमाग जोशी–कोंडी.)*

केरबा : *(घाई घाईनें)* तूं कसं पघितलंस ?

गोजी : नदीवर धुनं धुवाया ग्येलत्ये का ! तर दादाचाा हाकारा चाललाय्–मंग म्या पघितलं, तर दोघं नांगुर वढीत्यात गर्जेन म्हातारा बईल–त्याच्यानं वढवन झाला ! नांगुर तवा त्याच्या गळ्यांत हात घालून दादा म्हनीत्यात, चाल ल्येकरा ! ह्ये इ.वटचं चालनं– *(तिकडे पळूं लागते.)*

सोनबा : ए पोरी ! सांग की समदं–

गोजी : अव, दादांना आसुदाची उलटी झाली ! पर तसाच नांगुर वढीत्यात !

(पळते. केरबा तिच्या मागें जातो.)

सोनबा : इचितार ! इचितार ? ह्या हवालदाराचं समदंच इचितार ?

भिम्या : *(डोकं खाजवीत)* आपल्याला तर काई उमगना झालं !

[गळ्यात जुंपणें अडघवलेला आणि तोंड रक्ताळलेल धोंडी झेंपावत येतो. कोंडी आणि सरू त्याला धरायचा प्रयत्न करीत आहेत. तो त्यांच्या हातून सुटून वीराजवळ येतो. आपल्या तोंडांतून वहाणारें रक्त तो वीराला फांसतो–हात जोडून बोलतो–]

धोंडी : माज्या बापदाद्या ! म्यां तुला पघितलं न्हाई–इक्त मातर मला ठावं हाये, का तुजं रगातया धा येकरांत सांडलं हुतं ! आज तुजा मान मर्तब सांभाळन्यापाई माजंबी रगात काळ्या आईत सांडलं-आतां माज्यापाशीं काई न्हायलं न्हाई ! हुतं तित्तं समदं धिलं ! *(कोसळतो. सरू धांवत त्याचें डोकें मांडीवर घेते. स्फुंदत म्हणूं लागते–)*

सरू : दादा–

धोंडी : रडूं न्हाई बाई ! हवालदार घरान्याची कुळवंती रडत नसती–

(सरू धोंडीचें तोंड पदरानें पुसून काढते.)

(**कोंडी** : दोन्ही हातांनीं तोंड झांकून) दादा !

सरू : *(आंसवें रोधून)* ऊं हूं ! रडूं नका ! दादांनीं सांगितलं नाहीं का ? हवालदारांचं घराणं आसवं गाळीत नसतं ! तें वाहावतं रक्त !

पटाक्षेप